रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २४१ ॥ पृष्ठे ८
www.krushival.in



पान ३ वर

स्वप्नांची समाप्ती
-अग्रलेख

पान ४ वर


# कृषीवल

रायगड ॥ सोमवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹


अलिबाग येथील खडतालपूल जवळ अलिबाग-रेवस रोडला लागून सुमारे अडीच गुंठे सेप्रेट सातबारा असलेली जागा विकणे आहे.
संपर्क- ७७६८८६८०००

## १९२९ ते २०२२
# स्वरयुगांत

## शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

। मुंबई । प्रतिनिधी । नाम गुम हो जायेगा, चेहरा ये बदल जायेगा, मेरी आवाज ही पेहचान है, असे अभिमानाने सांगत गेली सत्तर वर्षांहून अधिक काळ समस्त भारतीयांच्या मनावर आपल्या स्वरांची मोहिनी घालणाऱ्या गानकोकिळा, स्वरसम्राज्ञी अशी बिरुदे मिळविलेल्या भारतरत्न, महाराष्ट्रभूषण लता मंगेशकर (वय ९३) यांनी रविवारी या जगाचा निरोप घेतला आणि चार पिढ्यांशी जुळलेला स्वररुपी युगाचा अंत झाला. जातपात, धर्म, भाषा, प्रांत, देश अशी सर्व बंधने तोडून प्रत्येकाच्या आयुष्यात अखंड आनंद भरणाऱ्या स्वरमैफलीने अखेरची भैरवी घेतली. नक्षत्रांचे हे देणे दिगंताच्या प्रवासाला निघून गेले. त्यांच्या निधनाने अवघा देश शोकाकूल झाला असून, त्यांच्या निधनाबद्दल दोन दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. •➤ पान २ वर

### भारतरत्नाने सन्मान

लता मंगेशकर यांना १९६९ मध्ये पद्मभूषण, १९९९ मध्ये पद्मविभूषण आणि २००१ मध्ये भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांना २००९ मध्ये 'ऑफिसर ऑफ द लीजन ऑफ ऑनर' हा फ्रान्सचा सर्वोच्च नागरी पुरस्कार देखील प्रदान करण्यात आला. लता मंगेशकर या 'भारतरत्न' पुरस्कार प्राप्त करणाऱ्या भारतातील एम एस सुब्बलक्ष्मी ( भारतरत्न – १९९८) नंतर दुसऱ्या महिला गायिका आहेत.



*कभी मुझको याद करके, जो बहेंगे तेरे आँसू*
*तो वहीं पे रोक लेंगे, उन्हें आके मेरे आँसू*
*तू जिधर का रुख करेगा, मेरा साया, साथ होगा ...*
*-कवी गुलजार*

## दीदींच्या निधनाने देश हळहळला



लतादीदींच्या गाण्यातील वैविध्य, दैवी सूर यांनी अनेक पिढ्यांना आनंद दिला. त्यांनी आवाजातून भारताचं सौंदर्य मांडलं. भारतरत्न लतादीदींची कारकीर्द कालातीत आहे. शतकातून एकदा असा कलाकार जन्म घेतो. दैवी आवाज आपल्याला सोडून गेला आहे. पण त्यांची गाणी मनात कायम राहतील.
– रामनाथ कोविंद, राष्ट्रपती



लता मंगेशकर यांच्या निधनामुळे झालेले दुःख हे शब्दांच्याही पलिकडचे आहे. लतादीदी आपल्याला सोडून गेल्या आहेत. त्यांच्या जाण्यामुळे देशामध्ये एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ती भरुन काढता येणे शक्य नाही. येणाऱ्या अनेक पिढ्यांना त्या कायम स्मरणात राहतील. लता मंगशकर यांच्या आवाजामध्ये लोकांना मंत्रमुग्ध करण्याची अशी क्षमता होती.
– नरेंद्र मोदी, पंतप्रधान



लता दीदींच्या जाण्यानं एका स्वर युगाचा अंत झाला, एक महान पर्व संपले. त्या देहाने नाहीशा झाल्या. हे अत्यंत दुःखद आहे. पण त्या त्यांच्या अमृत स्वरांनी अजरामर आहेत, विश्व व्यापून राहिल्या आहेत. त्या अर्थाने त्या आपल्यातच राहतील. अनादि आनंदघन म्हणून त्या स्वर अंबरातून आपल्यावर स्वरअमृत शिंपीत राहतील.
–उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

### ३० हजार गाण्यांचे रेकॉर्डिंग

लतादीदींनी वयाच्या १३ व्या वर्षी गायनाच्या क्षेत्रात पाऊल ठेवले होते. १९४२ मध्ये त्यांनी पहिले गाणे रेकॉर्ड केले होते. सात दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी विविध भाषांमध्ये ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी आणि हिंदीत मोठ्या प्रमाणात गाणी रेकॉर्ड केली आहेत.

## 'अमर रहे'च्या जयघोषात अखेरचा निरोप



अखेरचा हा तुला दंडवत...

। मुंबई । प्रतिनिधी ।
लतादीदींचे पार्थिव दुपारी त्यांच्या प्रभूकुंज या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. तेथे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेत आदरांजली वाहिली. त्यानंतर सायंकाळी त्यांचे पार्थिव तिरंग्यात लपेटून शिवाजी पार्क येथे नेण्यात आले. अंत्ययात्रेत मंगेशकर परिवारही सहभागी झालेला होता. शिवाजी पार्कवर पोलिसांनी बंदुकीच्या



फैरी झाडत महान गायिकेला अमर रहेच्या जयघोषात आणि लष्कर, पोलिस बॅन्ड पथकाच्या धीरगंभीर सुरावटीत अखेरचा निरोप दिला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह राजकीय, सामाजिक, संगीत तसेच बॉलिवुड क्षेत्रातील दिग्गज मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवाजी पार्कवर यापूर्वी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचाही अंत्यविधी करण्यात आला होता. मंत्रघोषात दीदींवर अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी त्यांच्या पार्थिवावर ठेवण्यात आलेला तिरंगा ध्वज सन्मानाने लष्कराच्यावतीने मंगेशकर परिवारकडे सुपूर्द करण्यात आला.

## राज्यात आज सार्वजनिक दुखवटा

भारतरत्न, गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या निधनामुळे दुखवटा म्हणून राज्य सरकारने सोमवार ७ फेब्रुवारी २०२२ रोजी राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. याशिवाय तीन दिवसांचा राज्यस्तरीय दुखवटाही जाहीर केला आहे. या काळात सरकारच्यावतीने कोणतेही जाहीर कार्यक्रम आयोजित केले जाणार नसून विधीमंडळासह सर्व जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय कार्यालये तसेच शासकीय कार्यालयांवरील तिरंगा ध्वज अर्ध्यावर ठेवण्यात येणार असल्याचे सूचित करण्यात आले आहे.





७५ वर्षांपासून सुप्रसिद्ध आयुर्वेदिक औषध
हिंगाच्या नैसर्गिक गुणधर्मांनी समृद्ध
गॅस | ॲसिडीटी | अपचन
गॅसचा त्रास, भूक न लागणे, मळमळ इत्यादीपासून मुक्त होण्यास मदत होते आणि पचनक्रिया सुरळीत ठेवण्यासही उपयुक्त
पोटातील वाताचा संचार, अपचन, पोटातील वात आणि पोटदुखी यामध्ये फायदेशीर
Available at all Leading Medical & Kirana Stores
For trade enquires contact: 94068 27556
Mumbai +91 95949 58916
Also available on AMAZON & FLIPKART

रिझर्व्ह बँक - एकात्मिक लोकपाल योजना



आरबीआय विनियमित संस्थांच्या विरुद्ध तक्रारींच्या निवारणासाठी एकल सुविधा

- 30 दिवसांच्या आत तक्रारींचे निवारण न झाल्यास किंवा आरबीआय द्वारा विनियमित बँका/एनबीएफसी/प्रणाली भागीदारांच्या द्वारा समाधानकारक निवारण न झाल्यास तुम्ही त्यांची तक्रार लोकपालांकडे (ऑम्बड्समॅन) दाखल करू शकता
- तुमची तक्रार दाखल करा, कुठूनही, कधीही
- तुमच्या तक्रारींची पोचपावती मिळवा आणि तिची सद्यस्थिती तक्रार व्यवस्थापन प्रणाली (CMS) पोर्टल वर बघा



आरबीआय सांगते आहे... जाणकार बना, सतर्क रहा!

अधिक माहितीसाठी **14448** ला कॉल करा.
तक्रार दाखल करण्यासाठी, **https://cms.rbi.org.in** वर जा

अधिक माहितीसाठी, **https://rbikehtahai.rbi.org.in/** वर जा
फीडबॅक देण्यासाठी, **rbikehtahai@rbi.org.in** ला लिहा

सार्वजनिक हितार्थ जारी
भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in



# ..अन नेहरुंच्या डोळ्यात तरळले अश्रू

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।** यंदाच्या प्रजासत्ताक दिनापासून राष्ट्रीय सणानिमित्त आयोजित बीटिंग रिट्रीट कार्यक्रमामध्ये 'ऐ मेरे वतन के लोगो'या गीताचा समावेश करण्यात आला. आजच्या घडीला हे गीत माहित नसलेला एकही भारतीय सापडणार नाही. प्रत्येक भारतीयाच्या ठायी राष्ट्रभक्तीचा स्फुलिंग जाणवणारे हे गीत जसे इतिहासात अजयामर आहेस, तशाच त्याच्या स्मृतीही. कारण हे गीत ऐकले अन देशाचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरु यांच्या डोळ्यात अश्रू तरळले.

२७ जानेवारी १९६३ चा तो दिवस. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्यासह देशभरातील अनेक लोक दिल्लीतील नॅशनल स्टेडीयमवर एकत्र जमले होते. चीनसोबत झालेल्या युद्धाच्या त्या कटू आठवणी देश अजून विसरला नव्हता. अशातच गानसम्राज्ञी लता मंगेशकर उभ्या राहिल्या आणि चीन युद्धात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली देण्यासाठी त्यांनी एक गीत गायले.

हे गीत ऐकून तिथे उपस्थित लोकांच्या डोळ्यांतून आपसूकच अश्रू अनावर झाले. स्वतः पंडित नेहरूसुद्धा अश्रू रोखू शकले नाहीत. आज इतकी दशके उलटूनही हे गीत ऐकल्यावर भारतीयांच्या अंगावर काटा आल्याशिवाय राहणार नाहीत. कवी प्रदीप यांनी लिहिलेले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध -केलेले हे एक सुप्रसिद्ध हिंदी देशभक्तीपर गीत आहे.

हे गीत १९६२ च्या चिनी हल्ल्यात शहीद झालेल्या भारतीय सैनिकांना समर्पित करण्यात आले होते. या गाण्याला जेव्हा लतादीदीचा सूरेल ओलाव्याची साभ मिळाली तेव्हा अनेकांची मने सद्गदित झाली.

इतक्या दशकानंतर आजही कोणत्याही राष्ट्रीय कार्यक्रमात हे गीत वाजल्याशिवाय राहत नाही. हे गीताने अनेकांच्या अंगात देशभक्तीची भावना पेरली.



# दीदींच्या निधनाने बॉलिवूड हळहळले...

## देशाने आपला आवाज गमावला

भारतीय चित्रपटसृष्टीतील दिग्गज गायिका लता मंगेशकरजी यांच्या निधनाने मला अत्यंत दु:ख झाले आहे. अनेक दशकांपासून आपल्या सुरेल आवाजाने भारतातील आणि जगभरातील संगीतप्रेमींना मंत्रमुग्ध करणाऱ्या लताजींच्या निधनाने भारताने आपला आवाज गमावला आहे.

- **व्यंकय्या नायडू**, उपराष्ट्रपती

## संगीताचा गोडवा

लता दीदींनी आपल्या सुरेल आवाजाने जगभरातील प्रत्येक पिढीचे आयुष्य भारतीय संगीताच्या गोडव्याने भरले आहे. त्यांचे निधन हे माझे वैयक्तिक नुकसान आहे.

- **अमित शाह**, केंद्रीय गृहमंत्री

## अलौकिक स्वर हरपले

जगभरातील कोट्यवधी संगीतप्रेमींच्या कानांना तृप्त करणारे अलौकिक स्वर आज हरपले. लतादीदींच्या आवाजाच्या परीसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर आता अनंतकाळ आपल्या मनांमध्ये गुंजन करत राहील.

- **शरद पवार**, राष्ट्रवादी अध्यक्ष

## संगीत विश्वातील देव्हारा रिता झाला

भारतरत्न लता मंगेशकर यांचे निधनामुळे संगीत विश्वातील देव्हारा रिता झाला आहे. त्यांचे संगीत देश, भाषा व काळ यांच्या सीमा उल्लंघून थेट अंतरात्म्याला जागवणारे होते. आपल्या भावगीतांनी ईश्वराला जागविण्याची, प्रेमगीतांनी तरुणाईला खुलवण्याची, देशभक्तीपर गीतांनी जवानांना स्फुरण देण्याची तर प्रेमळ अंगाईगीतांनी तान्हुल्यांना निजविण्याची जादू त्यांच्या स्वरात होती.

- **भगतसिंह कोश्यारी**, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य

## अशी गानकोकीळा होणे नाही

लतादीदींच्या सुरेल सूरांनी रसिकांचे भावविश्व आणि देशाचे कलाक्षेत्र समृद्ध केले. लतादीदींची गाणी, त्यांचे दैवी सूर हे सूर्य-चंद्र असेपर्यंत राहतील, परंतु त्या आपल्यात नसतील, ही कल्पना सहन होत नाही. अशी गानकोकीळा पुन्हा होणे नाही.

- **अजित पवार**, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र

## अलौकिक प्रतिभेच्या धनी

लतादीदी या देशाची शान आणि संगीत जगतातील स्वर शिरोमणी होत्या. सर्व संगीताच्या साधकांसाठी त्या प्रेरणादायी होत्या. संगीताच्या दुनियेला स्वरसाज चढवला आहे. त्या अलौकीक प्रतिभेच्या धनी होत्या. त्यांचे जाणे हे देशाचे कधीही भरून न येणारे नुकसान आहे.

- **नितीन गडकरी**, केंद्रीय मंत्री

## आठवणीतील संवाद सुरुच राहिल...

माझ्या संगीत क्षेत्रातील कामाची सुरुवातच मुळात लतादीदींबरोबर, त्यांच्या आशीर्वादाने झाली. माझ्या वाढदिवसाला त्यांनी मला सोन्याची गणपतीची मूर्ती दिली होती. या मूर्तीच्या रूपाने माझ्या डोक्यावर त्यांचा हात कायम असणार आहे. दीदींशी माझे नियमित फोनवर बोलणे व्हायचे. अलीकडे आम्ही व्हाट्सअॅपवरून जास्त संवाद साधायचो. त्यांना मोबाइल तंत्रज्ञानाची बरीच माहिती होती. माझी काही गाणी पाठवली की भरभरून कौतुक करायच्या. त्यांच्याशी होणारा हा संवाद आता शक्य नाही. पण त्यांच्या गाण्यातून, आठवणीतून हा संवाद अविरत सुरू राहील.

- **शंकर महादेवन**, प्रसिद्ध गायक

## स्वरसम्राज्ञी एकच

गानसम्राज्ञी, भारतरत्न लता मंगशेकर यांच्या निधनाने संगीतक्षेत्रातील मोठी हानी असून, एक पोकळीच निर्माण झाली आहे. स्वरसम्राज्ञी एकच होती आणि एकच राहणार. मी लहानपणी त्यांचे गाणे ऐकत असे आणि पुढे जाऊन त्यांचासोबत गाणे गाण्याची संधीही मिळेल हे मला वाटलेच नव्हते.

- **उदित नारायण**, ज्येष्ठ पार्श्वगायक

## आमचा आधार गेला

संगीताचा आमचा आधार गेला, संगीताचे आमचे दैवत नाहीसे झाले आहे, अशीच भावना आहे. गाणं कसे असावे, याचा वस्तूपाठ म्हणजे गाण्याचे सादरीकरण कसे असावे, उच्चार कसे असावे, चांगले काय वाईट काय हे आपल्याला दीदीमुळे समजले. लता दीदी शब्दांत सांगणे माझ्यासाठी खूप कठीण आहे. त्यांच्या आत्म्याला चिरशांती लाभो.

- **पद्मजा फेणाणी**, गायिका

## संगीत जगताची मोठी हानी

कुठेतरी आशा होती की, त्या बऱ्या होतील, पण तसे झाले नाही. संगीत जगताची मोठी हानी आहे. मंगेशकर कुटुंबीयांना एवढा मोठा आघात सहन करण्याची शक्ती देव त्यांना देवो. त्यांचा सूर, त्यांची गाणी अमर आहेत. त्यांना भेटल्यानंतर मी स्वत:ला विसरुन जायचे. त्यांनी मला खूप मोठा आशीर्वाद दिला आहे.

- **साधना सरगम**, गायिका

## सूरांचे वलय कायम राहिल

लताताई गेल्या, खूप वाईट वाटले. एक भावना प्रधान सूर गेला. लताताई तुमच्या आवाजाची जादू आणि सूरांचे वलय कायम ह्या पृथ्वीभोवती राहील यात शंकाच नाही, ओम शांती शांती शांती.

- सुलोचना चव्हाण, ज्येष्ठ अभिनेत्री

## संगीताचा आत्मा हरपला

लतादीदी मंगेशकर यांच्या निधनाने केवळ स्वर नाही, तर भारतीय संगीताचा आत्मा हरपला आहे. भारतीय संगीताचे हे दैवत आज आपल्यात नाही, ही कल्पनाच करवत नाही. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली !!!

- **देवेंद्र फडणवीस**, विरोधी पक्षनेते

## महान व्यक्तिमत्व हरपले

भारतरत्न लतादीदी यांच्या निधनाने एक महान व्यक्तिमत्व हरपले आहे. आपल्या स्वरांची मोहिनी त्यांनी अवघ्या विश्वाला घातली होती.

- **खा. सुनील तटकरे**,

## दैवी सूर हरपला

एक दैवी सूर आज हरपला आहे. खरंच अशी बातमी येऊ नये असे सगळ्यांना वाटत होते, दुर्दैवाने आज हे बोलावे लागत आहे. त्यांना मनापासून नमस्कार. हे मी भाग्य समजतो की, गेल्याच वर्षी आमच्या बालगंधर्व चित्रपटाविषयी त्यांनी ट्विट केले होते आणि सुबोध आणि माझे कौतुक केले होते. ती खूप मोठी गोष्ट होती आमच्यासाठी. आज त्या शरीराने आपल्यातून निघून गेल्या असल्या तरी त्यांचे सूर दशकानुदशके आपल्याला ऐकता येतील.

- **आनंद भाटे**, गायक

## स्वर्गीय सूर हरपला

आज ही अत्यंत वाईट घटना घडली आहे. एक स्वर्गीय सूर हरपला, आपल्या मराठी माणसातील एक हिरा हरवला आहे. शब्द तोकडे पडत आहे, असा स्वर पुन्हा होणे नाही. त्यांची आठवण माझ्या मनात कायम राहील. कायम भेटल्यावर नमस्कार हो असे आवर्जुन त्या म्हणायच्या. माझ्या त्या फॅन होत्या, ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट होती.

- **अशोक सराफ**, अभिनेते

## संगीतातले पर्व संपले

लतादीदींच्या निधनाचे वृत्त अतिशय वेदनादायी आहे. त्यांच्या निधनाने संगीत क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली असून, दिदींच्या जाण्याने संगीतातले एक पर्व संपले आहे.

- **छगन भुजबळ**, अन्न व पुरवठा विभाग मंत्री, महाराष्ट्र राज्य

## अजरामर आवाज

लता मंगेशकर यांच्या निधनाची बातमी दुःखद आहे. त्यांचा आवाज अनेक दशकांपासून लोकप्रिय आहे. त्यांचा आवाज नेहमी अजरामर राहील. त्यांचे कुटुंबीय, मित्र आणि चाहत्यांसाठी माझ्या संवेदना आहेत.

- **राहुल गांधी**, राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष

## स्वर्गीय सुरांचे सुवर्णपर्व संपले

आपल्या स्वर्गीय स्वरांनी भारतीय संगीत क्षेत्राला समृद्ध करणाऱ्या गानकोकीळा, भारतरत्न लता मंगेशकर यांच्या निधनाचे वृत्त सुन्न करणारे आहे. आपल्या सुमधूर आवाजाने त्यांनी संपूर्ण जगातील रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या निधनाने संगीत क्षेत्रातील एक सुवर्णपर्व संपले आहे.

- **नाना पटोले**, प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, राष्ट्रीय कॉंग्रेस

'मेरी आवाजही मेरी पहचान है', असे सांगणाऱ्या लता दीदींचा आवाज हा जगभरात लोकप्रिय होता. त्यांच्या जाण्याने आपल्या संगीत विश्वाची मोठी हानी झाली. त्यांच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली आहे ती कधीही भरून येणारी नाही. त्यांना आत्मशांती लाभो..!

- **अक्षय कुमार**, अभिनेता

मला अतिशय वेदना झाल्या आहेत. संगीतातील प्राण म्हणून लता दीदींची ओळख होती. लताजी यांचे आपल्या आयुष्यात एक वेगळे स्थान होते. त्यांनी गायलेली गाणी आजही चाहत्यांच्या मनात आहे. त्यांची जागा कुणीही घेऊ शकणार नाही.

- **अनिल कपूर**, अभिनेता

मी नेहमीच लता मंगेशकर यांना माझे आयडॉल मानले आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला आहे. मी नेहमीच त्यांची गाणी ऐकत आलो आहे. आम्ही खरचं किती भाग्यवान आहोत की, आम्ही त्यांची गाणी ऐकत मोठे झालो. मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

- **अजय देवगण**, अभिनेता

लताजींच्या निधनाची बातमी ऐकून खूप दु:ख झाले. त्यांच्या मधुर गाण्यांनी जगभरातील लाखो लोकांना मंत्रमुग्ध केले. सर्व संगीत आणि संगीतमय आठवणींसाठी धन्यवाद. मंगेशकर कुटुंब आणि प्रियजनांना माझ्या मनापासून संवेदना.

- **विराट कोहली**, भारतीय क्रिकेटपटू

## संगीत विद्येचे शाश्वत प्रतीक

लताताई यांच्यासारखी दुसरी व्यक्ती होणे नाही. संगीत विद्येच्या शाश्वत प्रतीकच! खऱ्या अर्थाने भारतरत्न!

- **आदित्य ठाकरे**, पर्यावरण मंत्री

## बाळासाहेबांनंतरचा मोठा आघात

लतादीदी आज आपल्यात नाहीत ही कल्पनाच सहन होत नाही. बाळासाहेबांनंतर त्या जणू आमच्या आधारच होत्या, सगळ्या सुख दु:खाच्या क्षणी आवर्जून पाठीशी राहणाऱ्या दीदींच्या जाण्याने आमच्या परिवारावर मोठा आघात झाला आहे.

- **रश्मी ठाकरे**

## अमर स्वरसम्राज्ञी

*स्वरसम्राज्ञी तू या स्वरांची*
*कंठातच तुझ्या स्वर जन्मती*
*तू गानकोळीळा, तू गानसम्राज्ञी*
*सूर तुझा व्यापून राही उभ्या जगती*
*तू दिली स्वरांना दिव्यत्वाची प्रचिती*
*मनोमनी ही तुझ्याच स्वरांची आरती*
*जीवन तुझे सारे सुरांच्या हिंदोळ्यावर*
*जग तरंगत राही तुझ्याच सुरांवर*
*तू सदैव राहशील आमुच्या मनामनात*
*अमर होवून आज प्रत्येकाच्या*
*घराघरात*

*- दीपक शेडगे, मो. ९९६९४०८८३५*

याशिवाय अनेक सेलिब्रिटींनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत लतादीदींना श्रद्धांजली वाहिली आहे. भारतीय संगीतसृष्टीतील सर्वोत्कृष्ट संगीतकार ए आर रहमान यांनी लता मंगेशकर यांच्यासोबत असलेला एक जूना फोटो शेअर करत लता दीदींना अभिवादन केले आहे. तर बॉलिवूड अभिनेत्री दीया मिर्झाने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून लता दीदींचा फोटो शेअर करत, 'लता मंगेशकर यांचा आवाज हा भारतीयांमध्ये नेहमीच राहील. आपल्या भारताच्या गौरवशाली कोकिळा. आपल्या भारतरत्न', असे कॅप्शन तिने दिले आहे.

रॅपर आणि गायक यो-यो-हनी सिंगने त्याच्या ट्विटर अकाऊंटवरून लता मंगेशकर यांचा फोटो शेअर करत, 'भारताचा नेहमीच एकच कोकिळा असेल. तुमच्या आत्म्याला शांती मिळो', असे कॅप्शन दिले आहे. तर अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी लता दीदींचा फोटो हातात घेतलेला एक फोटो शेअर करत हार्टब्रेक झाल्याचे इमोटिकॉन कॅप्शन म्हणून देत दुख: व्यक्त केले आहे.

अभिनेता सलमान खानने इन्स्टाग्रामवर लता दीदींसोबतचा फोटो शेअर करत, 'तुम्ही आमच्या आठवणीत नेहमीच राहाला कोकीळा. पण तुमचा आवाज आमच्या सोबत कायम असेल', असे कॅप्शन दिले आहे.

## दैवी स्वर अखेर शांत

गेल्या आठ दशकांहून अधिक काळ जगभरातील अगणित संगीतप्रेमींचे भावविश्व समृद्ध करणारा दैवी स्वर आज अखेर शांत झाला आहे. त्यांच्या चिरशांतीसाठी प्रार्थना !

**खा. उदयनराजे भोसले**

## भारताचे वैभव हरपले

लतादीदींच्या जाण्यामुळे भारताचे सर्वात मोठे वैभव काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशी गायिका पुन्हा होईल असे वाटत नाही. गाणारे लोक अनेक आहेत, पण लतादिदींसारखा आवाज, गाण्यातील भाव आणि संदेश हे दुर्मिळ आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात कष्ट करणाऱ्या श्रमिकांनी थकल्यानंतर लतादीदींचे गाणे ऐकले किंवा त्यांचा आवाज कानावर पडला की, क्षणात श्रमपरिहार होत असे. त्यांच्या हस्ते मिळालेला जीवन गौरव पुरस्कार हा जीवनातील सर्वाधिक आनंदाचा क्षण होता.

- **अण्णा हजारे**, ज्येष्ठ समाजसेवक, राळेगणसिद्धी

पान १ वरुन

## स्वरसम्राज्ञी

देशाचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद, उपराष्ट्रपती एम.वैंकय्या नायडू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, बॉलीवूड, मराठी चित्रपट आणि संगीत क्षेत्रातील मान्यवरांनी शोक प्रकट केला आहे. अशी लता पुन्हा होणे नाही..अशा भावपूर्ण शब्दात सर्वच मान्यवरांनी लतादीदींबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. रविवारी सायंकाळी शिवाजी पार्क येथे त्यांच्या पार्थिवार सरकारी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी अवघ्या देशवासियांचे डोळे पाणावले होते.

गेल्या काही दिवसांपासून लतादीदी आजारी असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. कोरोनासोबतच न्यूमोनियाची देखील लागण झाली होती. त्यांच्यावर मुंबईमधील ब्रीच कॅन्डी रुग्णालयात गेले २७ दिवस उपचार सुरु होते. मात्र, अखेर त्यांची प्राणज्योत मावळली.

## गीते राहिली, स्वर हरपला

भारताचा सुमधूर सूर हरपला ! लतादीदी आपल्याला सोडून गेल्या या गोष्टीवर अजूनही विश्वास बसत नाही. त्यांच्या हजारो गाण्यांचा सुरेल प्रवास आणि आवाज अजरामर राहणार आहे. संगीत क्षेत्रातील या प्रतिभासंपन्न महागायिकेला भावपूर्ण श्रद्धांजली !

– चंद्रकांत पाटील, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, भाजप

सुरश्री लता मंगेशकरजी यांच्या निधनाची बातमी दु:खद आहे. त्यांच्या निधनाने भारतीय कलाविश्वाची कधीही भरून न येणारी हानी झाली आहे. ईश्वर लताजींना श्रींच्या चरणी स्थान देवो आणि या दु:खाच्या प्रसंगी कुटुंबीयांना हे दु:ख सहन करण्याची हिंमत देवो.

– प्रियंका गांधी, राष्ट्रीय कॉंग्रेस

मंगेशकर यांच्या निधनाने संगीत जगताने आपल्या सुरेल आवाजाने अनेक पिढ्यांना मंत्रमुग्ध करणारा गायक गमावला आहे. माझ्या पिढीतील लोक त्यांची सुंदर गाणी ऐकत मोठे झाले आहेत, त्या नेहमी आपल्या स्मरणात राहतील. त्यांच्या आत्म्याला शांती लाभो.

– शाहबाज शरीफ, विरोधी पक्षनेते, पाकिस्तान

# हरवला चित्रसृष्टीचा सूर

## ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त भावूक



**। मुंबई । वृत्तसंस्था ।** गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या निधनामुळे कलाविश्वावर शोककळा पसरली असून, ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त भावूक झाले आहेत. याप्रसंगी चित्रसृष्टीचा सूर हरवला, अशा शब्दांत आपले दुःख व्यक्त करत, आपल्या आयुष्यातील एक प्रसंग सांगितला आहे.

राजदत्त म्हणतात की, मधुचंद्र हा माझा सिनेमा खूप गाजला आणि मी त्या यशाच्या मस्तीत होतो. पण त्यानंतर सात महिने मला कामच नव्हते. मी मद्रासला जाण्याचा निर्णय घेतला आणि तो सुलोचनाबाईना सांगितला. तेव्हा त्यांनी माझ्यासाठी भालजी पेंढारकर यांच्याकडे शब्द टाकला.

मी भालजीना भेटायला गेलो. त्यांनी मला असिस्टंट म्हणून कामास ठेवण्यास नकार दिला. पण त्यानंतर मला एक सिनेमा त्यांनी दिला आणि त्याच सिनेमाला पुढे राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. पुरस्कार मिळाल्याबरोबर मी कोल्हापूर गाठले आणि त्यांचा आशीर्वाद घेतला. तेव्हा ते म्हणाले, अरे माझे नाही लतादिदींचे आशीर्वाद घे. कारण त्यांच्यामुळे तुला हा सिनेमा मी दिला.

तेव्हा माझ्या लक्षात आले की, मी काम मागण्यास गेलो तेव्हा लतादीदी तिथे होत्या. मी कोल्हापूरवरून मुंबईला थेट त्यांच्या घरी पोहोचलो. त्यांचे आशीर्वाद घेतले. मी योग्य आणि चांगल्या मुलाला मी काम द्यायला सांगितले याचा मला आनंद असल्याचे म्हणत त्यांनी माझे कौतुक केले.

पुढे हा जिव्हाळा वाढत गेला. आज त्यांच्या निधनाची बातमी आली असून इतकेच सांगेन की असा निरागसपणा, सात्विकता पुन्हा कधी दिसणार नाही.

संपूर्ण चित्रपटसृष्टीचा सूर आज हरवला आहे, अशा शब्दांमध्ये ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.



# आता विसाव्याचे क्षण

'आता विसाव्याचे क्षण' ही कविता बा. भ. बोरकरांनी लिहिली आहे. त्याला सलील कुलकर्णी यांनी संगीताचा साज चढवला आहे. हे गाणं जवळपास पाच वर्षांपूर्वी रेकॉर्ड केलं होतं. पण, अचानक या गाण्यासोबत लतादीदींच्या निवृत्तीच्या बातम्या येऊ लागल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात होतं. पण, लतादीदींनीच ही अफवा खोटी असल्याचं स्पष्ट केलं होतं. अखेरच्या श्वासापर्यंत गाण्यावर प्रेम करणाऱ्या लतादीदींना आज मात्र विसावा घेतला आहे.

२०१८ साली सोशल मीडियावर लतादीदींचं एक गाणं वेगाने व्हायरल झालं. 'आता विसाव्याचे क्षण' हे गाणं लतादीदी यांचं निवृत्तीचं गाणं असल्याचा मेसेजही या गाण्यासोबत व्हायरल होत होता. त्यामुळे त्यांच्या फॅन्सनीही नाराजीचा सूर आळवला होता. ही बाब लतादीदींच्या कानावर गेली तेव्हा त्यांनी या निवृत्तीच्या बाबींचा साफ इन्कार केला. याबद्दल बोलताना एका मुलाखतीत लता दीदी म्हणल्या की, 'माझ्या निवृत्तीच्या चर्चा या केवळ अफवा आहेत. हे एखाद्या रिकामटेडया व्यक्तीचं काम असावं. मी शेवटच्या श्वासापर्यंत गातच राहणार आहे.' लतादीदींच्या या विधानामुळे चाहत्यांना दिलासा मिळाला होता.

लतादीदी म्हणजे भारतीय संगीत क्षेत्रातील मेरूमणी असं म्हटलं तर वावगं ठरू नये. लतादीदी आणि संगीत हे जणू एकमेकांसाठीच. वडिलांकडून मिळालेला संगीताचा वारसा मंगेशकर भावंडांनी जपला आहे. लतादीदींचे देशातच नव्हे तर, परदेशातही चाहते आहेत. हिंदी आणि इतर भाषांमध्येही लतादीदींनी हजारो गाणी गायली आहेत. ■

# आईचा आशीर्वाद हरपला



मुंबई : लतादीदींच्या जाण्यानं एका स्वरयुगाचा अंत झाला, एक महान पर्व संपले, आमच्यावरचा मातृतुल्य आशीर्वाद हरपला, अशा शब्दांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. स्वरसम्राज्ञी लतादीदी आज आपल्यातून देहाने नाहीशा झाल्या, हे अत्यंत दुःखद आहेत. पण, त्या त्यांच्या अमृत स्वरांनी अजरामर आहेत. विश्व व्यापून राहिल्या आहेत. त्या अर्थाने त्या आपल्यातच राहतील. अनादी आनंदघन म्हणून त्या स्वर अंबरातून आपल्यावर स्वरअमृत शिंपीत राहतील, अशा शोकमग्न भावनांसह मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

ठाकरे आणि मंगेशकर कुटुंबीयांचे जुने स्नेहबंध आहेत. शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांचे लतादीदी, हृदयनाथ, आशाताई यांच्यासह सर्वांशीच जिव्हाळ्याचे नाते राहिले आहे. त्या निष्णात छायाचित्रकार होत्या. उत्तम कॅमेरे, वेगवेगळ्या लेन्सेस यांचा त्यांचा अभ्यास होता. त्यांच्याशी मध्यंतरी कधीमधी फोटोग्राफी, कॅमेरे याबाबत चर्चा व्हायची. माझ्या दोन्ही छायाचित्र संग्रहांविषयी त्यांनी आवर्जून दाद दिली होती. काही निमित्ताने शुभेच्छा देण्यासाठी, काही कारणांनी चौकशी करण्यासाठी, त्यांचा फोन येत असे. मध्यंतरी मी रुग्णालयात असताना त्या सातत्याने माझी विचारपूस करून आशीर्वाद देत असत. त्यांचा तो आपुलकीचा सुमधुर स्वर आता पुन्हा कानी पडणार नाही. त्यांचा तो स्वर हे आमच्यासाठी परमसौख्य होते. हे सौख्य नियतीने हिरावून घेतले आहे. ही त्यांची उणीव जाणवत राहील. लतादीदींचे जाणे केवळ मंगेशकर कुटुंबियांवरच नव्हे तर, त्यांच्या करोडो रसिक चाहत्यांवर आघात आहे, अशी भावना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली.

# लतादीदींच्या आठवणींचा मोहक कोलाज!



मुंबई : लतादीदींच्या निधन वार्तेने सारा देश शोकाकुल झाला आहे. त्यांच्या गाण्यांनी अनेकांना समृद्ध केलंय. तर, कोणाच्या आयुष्याचा अखंड तुकडाच त्यांच्यात गुंतलाय. लतादीदींच्या आवाजाने भल्याभल्यांना मोहिनी घातली. प्रख्यात साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी त्यांचा उल्लेख करताना म्हटले होते की, आकाशात सूर्य आहे. चंद्र आहे आणि त्यानंतर फक्त लताचा स्वर आहे. वि.स. खांडेकरांनी कितीतरी वर्षांपूर्वी 'लता, छे कल्पलता!' या शीर्षकाचा लेख लिहिला होता. तर, सुप्रसिद्ध कवी ग्रेसांनी 'सांध्यपर्वातील वैष्णवी'मध्ये लतादीदींवर एक मोहक कविता लिहिली.

'लता' या पुस्तकात उषा मंगेशकर म्हणतात की, 'लता आमच्याकडे एकटी कमावणारी होती. १४ वर्षांची आणि आम्ही आठ जण खाणारे होतो. त्यामुळे त्या काळात अगदी एक परकर पोलकं नेसून लता आठ महिने राहायची. आपल्या भावडांची म्हणजेच हृदयनाथ आणि उषा यांचे लाड करावे असं तिला वाटायचं. त्यांना चांगली कपडे घेऊन द्यावेत, पण ते शक्य नव्हतं. मग तिने एक दिवस मास्टर विनायक यांच्याकडून दोन ड्रेसेस मागून घेऊन आणले. चित्रपटात वापरण्यात येणाऱ्या आणि अंगाने मोठे असलेले ड्रेसेस घालून हृदयनाथ मंगेशकर आणि उषा मंगेशकर वावरू लागली.'

हृदयनाथ मंगेशकर 'लता' पुस्तकातील लेखात म्हणतात की, 'जेव्हा एक खासगी मैफल चालू असताना रेडिओ लागला आणि लताचं गाणं लागलं तेव्हा बडे गुलाम अली म्हणाले की, 'याला म्हणतात आवाज आणि आणि ती मैफल तिथेच बंद केली.' लता मंगेशकर यांच्या सुरांनी कवी ग्रेसांनाही मोहिनी घातली होती. त्यांनी लता दीदींवर 'लता मंगेशकर' या नावाने एक कविता लिहिली. ती कविता त्यांच्या 'सांध्यपर्वातील वैष्णवी' या कवितासंग्रहात आहे.

ग्रेस म्हणतात-
माहेराहून गलबत आले
मला सखीचे स्वप्न जडे
हृदयामधल्या गुपितामध्ये
निशिगंधाचे फूल पडे.

अंतर्ज्ञानी युगांप्रमाणे
शब्द परतले घरोघरी
जड बंधाच्या मिठीत रुसली
चैतन्याची खुळी परी.

या वाटेवर रघुपती आहे
त्या वाटेवर असे शिळा
सांग साजणी कुठे ठेवू मी
तुझा उमलता गळा?

# ...अन् 'ऐ मेरे वतने के लोगों' 'सिग्नेचर ट्यून' बनलं!

कवी प्रदीप यांनी लिहिलेलं हे अलौकिक गाणं त्यांनी आपली बहीण आशा भोसलेंसह 'ड्यूएट' रेकॉर्ड करावं, अशी लतादीदींची इच्छा होती. परंतु, कवी प्रदीपजींनुसार लतादीदींच्या आवाजात जी भावना आहे, ती इतर कोणालाही जमणार नाही, म्हणून ते गाणं फक्त लतादीदींनीच रेकॉर्ड करावं, असं प्रदीपजींचं ठाम मत होतं. त्यामुळे आशा भोसलेंनी या प्रोजेक्टमधून माघार घेतली. अहोरात्र काम करत असताना एका गाण्याकडे विशेष लक्ष देणं अशक्य वाटतं, असं सांगत लतादीदींनीही गाण्यास नकार दिला. संगीतकार-गायक हेमंत कुमार यांनी खरं तर संपूर्ण 'ऐ मेरे वतन के लोगों' हा प्रोजेक्ट तयार केला होता.

दीदी म्हणाल्या की, हे गाणं कोणत्याही चित्रपटाचा भाग नसल्यामुळे त्याचा परिणाम मर्यादितच होईल असं मला वाटलं होतं; परंतु 'ऐ मेरे वतन के लोगों' हे गीत माझं 'सिग्नेचर ट्यून'च बनलं. जोपर्यंत मी ते गात नाही, तोपर्यंत माझा कोणताही कार्यक्रम, मैफिल पूर्ण होत नाही.






# स्वर लोपले

अतुल गुळवणी
९२७०९२५२०१

रत्नहाराच्या सौंदर्याची पारख करायला रत्नपारख्याची गरज भासत नाही. त्याच्या तेजावरुनच रत्नहाराची प्रचिती येत असते. रात्रराणीच्या सुगंधाचीही कुणी चर्चा करीत नाही. वाऱ्याच्या एका झुळकेबरोबरच त्या रातराणीच्या सुगंधाचा मोहक सुवास सर्वत्र दरवळत. तद्वतच गानसम्राज्ञी लतादीदी मंगेशकर यांच्या सुमधुर आवाजाची महती सांगायला कुणा ज्योतिषाची गरज भासली नाही. त्यांच्या सुमधुर आवाजातून उमटलेल्या गाण्यांच्या ओळ्यांतून लतादीदी काय ताकदीच्या गायिका आहेत, हे अवघ्या भारतानेच नव्हे तर, जगाने अनुभवले. गेली सत्तर-ऐंशी वर्षांहून अधिक काळ आपल्या स्वरांनी अवघ्या भारतीयांना मोहिनी घालणाऱ्या लतादीदी... भारतरत्न लतादीदी... लाखो गाणी गुणगुणत त्या गाण्यांना प्रचंड लोकप्रिय करणाऱ्या स्वरसम्राज्ञी लतादीदी... चित्रकार लतादीदी, उत्तम फोटोग्राफर लतादीदी, क्रिकेटच्या चाहत्या लतादीदी... अशा असंख्य रुपांतून या सरस्वतीने मराठी माणसालाच नव्हे तर, जिथे जिथे भारतीय माणूस जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे, अशा अवघ्या विश्वालाच मोहोवून टाकलेले आहे. अवघ्या मराठी माणसाच्या दिवसाचा प्रारंभ लतादीदींच्या सुमधुर स्वरांनी होतो आणि त्यांच्याच सुमधुर स्वरांनी शांत, शांत झोपही लागते. इतके अतूट नाते लतादीदींचे मराठी माणसाशी आहे. त्यांनी आतापर्यंत विविध प्रकारची हजारो गाणी पार्श्वगायिका म्हणून गायिली. त्या प्रत्येक गाण्याला लतादीदींचा परिसस्पर्शच झाला आणि त्या परिसाचे सोन्यात रुपांतर झाले असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. मराठी भक्तीसंगीत असो वा भावगीते, शेकडो चित्रपटांना लतादीदींनी पार्श्वगायन केले आहे, ती सर्व गाणी लोकप्रियच ठरली. अगदी पन्नास, साठ, सत्तरच्या दशकात ज्या ज्या मराठी, हिंदी चित्रपटांमधील गाण्यांना लतादीदींनी पार्श्वगायन केले, ती गाणी आजही प्रचंड लोकप्रिय आहेत. मग त्यात प्रेमगीत असो वा विरहगीत अथवा एखादे भजन, भावगीत; या सर्व गीतांचे स्वर कानी पडले की ऐकणारा तल्लीन झाल्याशिवाय राहात नाही. इतकी जादू लतादीदींच्या आवाजात ठासून भरलेली आहे.

साधी राहणी, उच्च विचारसरणी हे ध्येय उराशी बाळगून, व्यवसायाशी एकनिष्ठ राहिलेल्या लतादीदी या बहुआयामी व्यक्तिमत्त्व होत्या. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांची ज्येष्ठ कन्या असलेल्या लतादीदींनी दीनानाथांच्या पश्चात आपल्या आई माई मंगेशकरांसह चार भावंडे, उषा, आशा, मीना आणि पंडित हृदयनाथ मंगेशकर यांचे संगोपण करताना घराचा नावलौकिक आपल्या अवीट गायिकेने वाढविला. त्यामुळे वयाची ९३ वर्षे पूर्ण केली असली तरी त्यांच्यातील विनम्र भाव तसूभरही कमी झालेला नव्हता. सदैव हसतमुख चेहरा, वागण्यातही घरंदाजपणा, जरीकाठीची शुभ्र पांढरी साडी असा त्यांचा साधाच, पण भारतीय संस्कृती जोपासणारा पोषाख सर्वांनाच कायमचा भावला. अगदी विदेशातही संगीत रजनीचे कार्यक्रम करताना लतादीदींनी आपल्या वागण्यात किंचितही फरक केला नाही. उलट, त्यांच्या या अत्यंत शिस्तबद्धपणामुळे त्यांचे कायक्रम नेहमीच लोकप्रिय होत राहिले.

मराठी चित्रपटसृष्टीतही लता मंगेशकर यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. विशेष करुन, चित्रतपस्वी भालजी पेंढारकर यांच्या प्रत्येक चित्रपटातील गीते ही लता मंगेशकर यांनीच गायिली आहेत. 'आनंदघन' म्हणून त्यांनी भालजी पेंढारकर निर्मित साधी माणसं, मराठा तितूका मिळवावा आदी चित्रपटांसाठी पार्श्वसंगीताबरोबरच पार्श्वगायनही केलेले आहे. या सिनेमातील सर्वच गाणी कमालीची लोकप्रिय झाली. सत्तर वर्षांनंतरही त्या गाण्यांची अवीट गोडी तसूभरही कमी झालेली नाही. मराठी मातीशी इमान राखत लतादीदींनी शेकडो मराठी चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले. ते सर्वच चित्रपट आजही केवळ लतादीदींच्या गाण्यांसाठी कमालीचे लोकप्रिय ठरलेले आहेत. चित्रपती व्ही. शांताराम यांनी निर्माण केलेल्या दो आँखे बारह हाथ असो वा नवरंग अथवा पिंजरामधील दे रे कान्हा चोळी अन् लुगडी... हे गायिलेली लावणी असो. यामधील लतादीदींनी गायिलेली गाणी आजही रसिकाना भूरळ पाडल्याशिवाय रहात नाही. पिंजराच्या निर्मितीला पन्नास वर्षे पूर्ण झाली.या सिनेमातील गाणी उषा मंगेशकर यांनी म्हटली आहेत.फक्त एकच गाणे लतादीदींनी म्हटले.अशा कितीतरी घटना लतादीदींच्या बाबतीत सांगता येतील. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचे अभंग लतादीदींनी आपल्या सुमधुर आवाजांनी अजरामर करुन टाकले. त्यामुळे ज्ञानोबांची ज्ञानेश्वरी स्वररुपाने मराठी माणसांच्या मनात कायमची घर करुन राहिली. अगदी पहाटेच्यावेळी लतादीदींचे स्वर कानी पडले की प्रत्येक मराठी माणूस प्रसन्न होऊन जात असे. तीन, चार पिढ्यांचे ऋणानुबंध या स्वरांनी कळत-नकळत जुळून राहिलेले आहेत. वयाची नव्वदी पार केली असली तर लतादीदींच्या स्वरात तसूभरही फरक पडलेला नव्हता. उलट, उतारवयातही विविध आजारांवर मात करीत त्यांचा स्वर अखेरपर्यंत आहे तसाच राहिला. ही त्यांना लाभलेली दैवी देणगीच म्हटली पाहिजे.सरस्वतीच जणू त्यांच्या मुखातून उमटत राहिली. मग ते अभंग असो वा भावगीते, प्रेम, विरह अशी कितीतरी प्रकारची गाणी लतादीदींनी गायिली. पण, त्या सर्व गाण्यांचे माधुर्य रसिकांच्या मनातच नव्हे तर, हृदयात अमृतासारखे पाझरत राहिले, हे नक्की.आज लतादीदी शरीराने या जगात नसल्या तरी त्यांचा आवाज हीच त्यांची खरी ओळख राहणार आहे. त्या ुद्धा मोठ्या अभिमानाने म्हणत असत.

नाम गुम जायेगा, चेहरा ये बदल जायेगा
मेरी आवाज़ ही, पहचान है
गर याद रहे..

खरंच आहे. देहाने त्यांनी जगाचा निरोप घेतला खरा; पण लौकिकार्थाने त्या या दुनियेत आपल्या जादुई आवाजाने मात्र चिरंतर स्मरणात राहतील, हे नक्की. लतादीदींविषयी किती, लिहावे, काय लिहावे तेवढे थोडेच आहे. प्रत्येक भारतीयाच्या मनात त्यांच्याविषयी नेहमीच आदर वाटत होता आणि यापुढेही तो आदर तसाच राहील, हे त्रिवार सत्य आहे. लतादीदींना भावपूर्ण आदरांजली.

लतादीदींनी कविवर्य भा.रा. तांबे यांची
जन पळभर म्हणतील हाय हाय
मी जाता राहील कार्य काय?

ही कविता आपल्या आवाजाने अजरामर केली आहे. एखादी व्यक्ती लोप पावली की सारेजण क्षणभर हाय हाय करतील. पण, लतादीदींच्या बाबतीत तसे घडणार नाही. जोपर्यंत चंद्र, सूर्य आहेत, तोपर्यंत लतादीदींचा आवाज हा समस्त रसिकांना मंत्रमुग्ध केल्याशिवाय राहणार नाही. महान गायिकेला भावपूर्ण आदरांजली. ■



## संपादकीय

# स्वप्नाची समाप्ती

गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे जाणे म्हणजे एका स्वर्गीय अनुभूतीच्या स्वप्नातून खडतर वास्तवात येणे आहे. हे स्वप्न केवळ एका रात्रीचे नव्हे तर, सात दशकांचे होते. लता मंगेशकर यांची कारकीर्द म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून सजायला लागलेली संपूर्ण भारतीयांसाठीची सांगितिक मैफल होती. ही मैफल अशीच चिरंतन सुरू राहील असे वाटत असताना, हा स्वप्नभंग झालेला आहे. त्यांच्या गाण्यांचे सूर हवेतील प्राणवायूप्रमाणे गृहीत धरलेले होते. अवघ्या आकाशभर पसरलेल्या चांदण्यांसारख्या असलेल्या आपल्या सिनेसंगीताच्या विश्वात लतादीदींचे गाणे कोणत्याही दिशेने पाहिले तरी दृष्टीस पडणारे होते. या स्वर्गीय स्वराच्या अंमलाखाली आपण सुनिश्चितपणे गुंगून गेलो होतो. अचानक हे सात दशकांहून अधिक काळ अवघे राष्ट्र पाहात असलेले स्वप्न समाप्त झाले आहे. त्यांचे 'ऐ मेरे वतन के लोगों' ऐकून साठ वर्षांपूर्वी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या डोळ्यांत जसे पाणी आले, ते आज साठीत असलेल्या किंवा विशीत असलेल्या रसिकाच्या डोळ्यांत त्यांच्या गाण्यांतील विविध भावभावना अनुभवताना आजही येते. देशविदेशातील तब्बल ३६ भाषांतून गायलेल्या गाण्यांद्वारे त्यांनी भावविभोर करून टाकले नाही असा माणूस शोधणे कठीण आहे. स्वातंत्र्याच्या काळातील रसिकांपासून एकविसाव्या शतकात जन्माला आलेल्या मिलेनियल्सनाही त्यांनी आपल्या स्वरराज्यात सामील करून घेतले होते. मास्टर दीनानाथ या संगीतसूर्याच्या पोटी जन्मलेल्या आणि संगीतसंस्कार लाभलेल्या लताने वयाच्या पाचव्या वर्षीच आपल्या आवाजातील दैवी स्वरांचे अस्तित्व दाखवायला सुरुवात केली होती. वडिलांच्या अकाली निधनानंतर लता आधी मास्टर विनायक व नंतर उस्ताद अमन अली खान यांच्या शागीर्द बनल्या. ज्येष्ठ संगीतकार उस्ताद गुलाम हैदर हे खऱ्या अर्थाने लताच्या प्रतिभेचे द्रष्टे भाकितकर्ते आणि मेंटॉर ठरले. त्यांनी तिला केवळ पहिले हिट गाणे दिले नाही तर येणाऱ्या दशकांत लताने आपल्यासाठी गावे यासाठी सगळेजण तिच्या पायाशी येतील, असे भाकित केले. ते लवकरच खरेही ठरले आणि पुढील अनेक दशके लताचे स्वरराज्य भारतावर कायम राहिले. मधुबालावर चित्रीत 'आएगा आनेवाला' हे महल चित्रपटातील गाणे लतासाठी व्यावसायिकदृष्ट्या पहिले सर्वाधिक हिट गाणे ठरले. साल होते १९४९. त्यानंतरचे दशक हे अनिल विश्वास, शंकर जयकिशन, नौशाद, एसडी बर्मन, सी. रामचंद्र, हेमंत कुमार, खय्याम, सज्जाद हुसैन, सलील चौधरी, कल्याणजी आनंदजी, सुधीर फडके, वसंत देसाई, मदन मोहन आणि अशा असंख्य एकाहून एक सरस संगीतकारांचा काळ होता. हिंदी सिनेसंगीताचा हा सुवर्णकाळ मानला जातो. त्यात लताचा आवाज अविभाज्य बनला. १९५८ मध्ये 'मधुमती'मधील 'आजा रे परदेसी' यासाठी पहिले फिल्मफेअर मिळाले. पुढे राष्ट्रीय पुरस्कार आणि नंतर 'भारतरत्न'पर्यंतचा त्यांचा प्रवास हा त्यांचा प्रभाव पुढच्या दशकातही कसा वाढत गेला याचे द्योतक आहे. पुढे लक्ष्मीकांत प्यारेलाल, आरडी बर्मन असे नवे संगीतकार आले. त्यांच्यासाठीही लताचा आवाज अटळ ठरला. तीच बाब सहगायकांची. किशोर, मुकेश, मोहम्मद रफी हे त्यांचे आधीचे सहगायक होते. काळासोबत संगीतकार बदलले तसे सहगायकही. भारत बदलला, अभिरुची बदलली, मात्र लताचा आवाज ध्रुवताऱ्यासारखा स्थिर आणि नित्य होता. या क्षेत्रातील कारकीर्द एखाद्या पिढीपर्यंतची असते, मात्र लतादीदींनी आधी ज्यांच्यासोबत काम केले, त्यांची पुढची पिढी संगीतकार म्हणून आली, त्यांच्यासाठीही त्या गाणे गायल्या. 'रंग दे बसंती'साठी ए.आर. रहमान या आधुनिकोत्तर संगीतकारासाठीही त्यांनी आपला आवाज दिला आणि 'लुका छुपी' हे विलक्षण लोकप्रिय गाणे दिले. इतक्या त्या हरेक दशकात समर्पक ठरल्या. म्हणून त्यांचा आवाज हा स्वतंत्र भारताचा सुवर्णोतेहिस आहे. सत्तर मजली इमारतीतील आलिशान फ्लॅटमध्ये त्यांचे आवाज घुमतात, तसेच ते रस्त्याकाठी झावळ्यांनी उभारलेल्या टपरीभोवतीही वावरत असतात. सुखासीन माणसाला जितका ते मनाला आराम देतात, तितकेच त्यांचे स्वर शरीर मोडून काम करणाऱ्यांचे विसाव्याचे क्षण सुखद बनवतात. त्या अर्थाने लतादीदींनी आपल्या सगळ्यांचे जीवन संगीतमय केले. त्या गात होत्या आणि आपण सुनिश्चित होतो. लतादीदीच्या असण्याने ही नीती होती. आता त्या ताऱ्यांच्या पलीकडच्या प्रवासाला निघून गेल्या आहेत. आपले सूरमयी तारांगण आपल्यासाठी मागे ठेवून गेल्या आहेत. सभोवती काळोख असताना आकाशाकडे पाहिल्यावर तारे कायम दिसतात आणि दिलासा देतात, तसा त्यांचा स्वर, संगीत इथून पुढची शतकेही जगाला शांतवत राहील. लतादीदींना विनम्र आदरांजली!

# स्वरगंगा विसावली

श्रीधर फडके

**अंगभर लपेटलेली साडी, दोन्ही खांद्यांवर ओढून घेतलेला पदर, कमरेपर्यंत येणारे केस, जणू वीणा झंकारत असल्याची अनुभूती देणारा मंजुळ आवाज आणि अत्यंत अदबशीर वावर असणारी लता आज अनंताच्या प्रवासाला निघाली आहे. ज्या गळ्यात दैवी सूर होता, ती लता आज आपल्यात नाही. खरं तर, लता हे केवळ नाव नाही तर एक आख्यान आहे. देहरुपात आपल्यात वावरुन गेलेलं ते सरस्वतीचं परमंगल रुप होतं.**

लता... झाडाच्या आधारे वाढते ती लता... नाजूक असते ती लता... अवघं आयुष्य आधार देणाऱ्या वृक्षावर अवलंबून असते ती लता... पण लता या शब्दाची ही ज्ञात ओळख बदलून टाकली ती आपल्या लाडक्या लतानं. या लतानं वाढण्यासाठी नक्कीच कोणाचा ना कोणाचा आधार घेतला पण पुढे वस्तुस्थिती अशी झाली पुढे ते लोक तिच्या आधारे वाढले आणि नावारुपाला आले. या लतेचा विस्तार कधीच आपल्या मूळ आधारापुरता सीमित राहिला नाही तर त्याला वेढून दशांगुळे उरला. लता हे असं वादळ होतं की झुळूक, स्वराचा सागर होता की निर्झर, ते क्षितिज होतं की शेजार या प्रश्नांची उत्तरं कधीच मिळणार नाहीत. पारा दिसतो पण कधीच हातात येत नाही तसाच लताचा स्वर... वर्षानुवर्षे आपण तो ऐकतो, कानात साठवतो हृदयात उतरवतो पण त्याला हात घालण्याची भल्याभल्यांची ताकद नव्हती आणि कधीही असणार नाही. याचं सोपं कारण म्हणजे प्रत्येकाचं स्वरयंत्र विधात्यानं स्वत: बनवलेलं नसतं. दीदींचं स्वरयंत्र जणू असा साकव होता ज्यातून उतरलेल्या प्रत्येक शब्दावर, चालीवर संस्कारांची पखरण होत असे. त्यांचं उच्चारण अर्थाची डूब वाढवून जायचं. लताचा स्वर एकतारीत कधी एकटा पडला नाही तर वाद्यांच्या प्रचंड गोंगाटात कधी हरवून गेला नाही. तो नेहमीच आपली स्वतंत्र ओळख टिकवून राहिला. कारण तो स्वर अगाध होता, अनंत होता. आज दीदींनी देह ठेवला आहे. पण, त्यांच्या स्वराला मरण नाही. भूपाळीपासून अंगाई गीतांपर्यंत आणि विराण्यांपासून प्रेमगीतांपर्यंत तो आपल्याला भेटत राहणार आहे. स्वरांच्या रुपानं दीदी कायमच आपल्यात राहणार आहेत.

काही प्रसंगी शब्द संपतात, ओठावर असले तरी उच्चारणं कठीण होतं आणि परिस्थितीचा मूक स्वीकार करण्याखेरीज आपल्या हाती काहीही रहात नाही. भारतरत्न लता मंगेशकर यांचं या जगाचा निरोप घेऊन जाणं ही अशीच एक घटना आहे. समस्त जगाला दिपवून टाकणारा स्वर आपल्यातून निघून गेला आहे. या स्वरानं जगावर अधिराज्य गाजवलं होतं. हिंदू चित्रसृष्टीवर आपला अमीट ठसा उमटवला होता. खरं तर, या प्रचंड आव्हानात्मक आणि मोठा आवाका असणाऱ्या सृष्टीवर राज्य करणं ही कठीण बाब होती.

पण लतादीदींच्या स्वर्गीय स्वरांची मोहिनी अशी विलक्षण होती की त्यांनी सर्वांनाच मोहित करुन टाकलं. आपण सगळेच त्यांची गाणी ऐकत मोठे झालो आहोत आणि आपल्या अखेरच्या क्षणापर्यंत त्यांची गाणी आपली साथ देणार आहेत. बाबुजींबरोबर त्यांची अनेक गाणी गाजली. दीदी त्यांना फडकेसाहेब म्हणायच्या. ज्योतीकलश झलके... हे त्या दोघांनी अजरामर करुन ठेवलेलं गाणं आजही आपली सकाळ प्रसन्न करुन जातं. अशी असंख्य गाणी आहेत ज्यांचा साधा उल्लेख करायचा झाला तरी कैक तास सरतील. अलीकडे प्रत्यक्ष भेट होत नसली तरी फोनवर मी त्यांच्या संपर्कात होतो. चार महिन्यांपूर्वी आमचं फोनवर बोलणं झालं होतं. त्यावेळी आमच्या मनमोकळ्या गप्पा झाल्या होत्या. दुर्दैवाने तेच आमचं शेवटचं संभाषण ठरलं.

दीदींनी कधीच आपले विचार, आपली मतं, आपली अस्मिताकेंद्रं दडवून ठेवली नाहीत. त्या प्रखर राष्ट्रभक्त होत्या. त्यांची राष्ट्राप्रतीची निष्ठा वेळोवेळी दिसून आली. त्यांची सावरकरनिष्ठाही कधीही लपून राहिली नाही. शिवाजी महाराजांप्रतीचा आदर आणि अपार निष्ठा तर जणू त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग असल्यासारखी स्थिती होती. या सगळ्यातूनच त्यांच्या प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाची ओळख होत होती. आता अशी तत्त्वनिष्ठ व्यक्तिमत्त्वं बघायला मिळणं, त्यांचे विचार ऐकायला मिळणं अवघड आहे. मध्यंतरीच बाबासाहेब पुरंदरे आपल्याला सोडून गेले. आता दीदी आपल्यात नाहीत. दिवसेंदिवस ही पोकळी वाढतीये असंच आपण म्हणू शकतो. मला दीदींचा स्नेह मिळाला. त्यांच्याशी गप्पा मारण्याचा अनेकदा योग आला. बाबूजींबरोबरच किंबहुना त्यांच्या आधी माझ्या आईशी त्यांचा परिचय होता. याच क्षेत्रात असल्यामुळे दोघी एकमेकींना चांगल्या ओळखत होत्या. चाळीसच्या त्या दशकात त्यांचा घनिष्ट संबंध होता. त्या माझ्या लग्नाला आवर्जून उपस्थित राहिल्या होत्या. मला अजूनही आठवतंय, त्या दिवशी त्यांचा उपास होता. मात्र उपास सोडून त्यांनी भोजन घेतलं होतं. आता त्या फक्त आठवणी राहिल्या आहेत. मला त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली नाही. त्यांनी माझं एखादं गाणं म्हणावं, ही इच्छा अखेरपर्यंत अपूर्णच राहिली. पण, तरीही त्यांच्या असंख्य गाण्यांनी मला समृद्ध केलं. त्यांचे जगावर अपरिमीत उपकार आहेत. त्याचं स्मरण ठेवणंच आता आपल्या हातात आहे.



आधी उल्लेख केल्याप्रमाणे बाबुजींची अनेक सुंदर गाणी लतादीदींनी अप्रतिम स्वरांद्वारे रसिकांपर्यंत पोहोचवली. सजनी या चित्रपटातलं किस्मत का नही दोष सावरे, दोष नही इन्सानका हे गाणं दीदींनी बाबूजींबरोबर गायलं. रत्नघर हा बाबूजींचा चित्रपट. त्यातली अप्रतिम गाणी दीदींनी आपल्या सुरांनी आणखी फुलवली. पण काही कारणानं हा चित्रपट प्रदर्शित झाला नाही. बांध प्रित फुलोरा सारखी गोड गाणी लतादीदींच्या स्वरांनी आणखी अवीट ठरवली. शेवग्याच्या शेंगा या चित्रपटातलं इच्छा देवाची सुख देवासी मागावे हे गाणं अविस्मरणीय ठरलं. लतादीदी गाण्यासाठी उभ्या राहिल्या की रसिकांना साक्षात ईश्वरीशक्तीचा अनुभव येत असे. त्यांनी आपलं तेज स्वकर्तृत्वानं प्रकट केलं. स्वररत्न पुरस्कार मिळाला त्यावेळी लतादीदी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या.

त्यावेळी त्या म्हणाल्या होत्या, फडकेसाहेबांची अनेक सुंदर गाणी मी गायली आहेत. आता श्रीधरचं गाणं गायला आवडे. ही विनयशीलता नतमस्तक करायला लावणारी होती. लतादीदी संगीतकार सांगेल तसं गायच्या. एवढंच नव्हे, तर काही वेळा त्यात बदलही सुचवायच्या.

त्यांच्या गायनातल्या जागा कळीदार असायच्या. शास्त्रीय संगीत असो वा भावगीत, प्रेमगीत असो वा विरहगीत त्यांच्या सुरावटीतून तो तो भाव नेमकेपणानं प्रतित होत असे. आवाजातलं इतकं वैविध्य क्वचितच पहायला मिळतं. आपल्या स्वरांच्या शक्तीनं, गायकीनं लतादीदींनी चित्रपटसृष्टीवर सुरांचं राज्य निर्माण केलं. म्हणूनच आता हे राज्य उदास, ओसाड झाल्याची भावना आणि त्याची तीव्र वेदना दाटून येत आहे. दीदींना भावपूर्ण श्रद्धांजली.

# अंत:करणाला स्पर्शणारा स्वर

सदानंद गोखले

**लता मंगेशकर हे नाव आज अमर झालंय. १९४७ मधला आपकी सेवा मे ते २००१ मधला मोहब्बते ही वाटचाल म्हणजे स्वरांची रोषणाई, माधुर्याची किमया की कुदरत का करिश्मा हे आपापल्या मगदुराप्रमाणे ठरवायचं. आयेगा आनेवाला, कही दीप जले कही दिल ही हॉंटींग सॉंग्ज असोत वा धीरे से आजा रे अखियन में निंदियासारखी लोरी, लता मंगेशकर यांचा स्वर प्रत्येक संवेदनक्षम माणसाच्या अंत:करणाला स्पर्श करुन गेलाय.**

स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर हे नाव भारतात आणि परदेशात केव्हाच पोहोचलं; कदाचित ते चंद्रावरही पोहोचलं असावं. त्यांनी निर्माण केलेल्या सुरांच्या चांदण्यांमध्ये न्हाऊन निघालो हे आपलं भाग्य. असा योग खरोखर फार कमी वेळा येतो. लतादीदींनी आजवर संगीतक्षेत्रात एवढं अनमोल योगदान दिलं आहे की त्यांच्या तोडीचं काम अजून सहस्त्र वर्षं तरी कोणाला जमणार नाही. लहानपणापासून सातत्याने स्वरशारदेची पूजा करणारी ही महान गायिका पूजनीय आहे. त्यांना उपजतच आवाजाची ईश्वरदत्त देणगी मिळाली. लतादीदींनी आपलं संपूर्ण जीवन केवळ गाण्यासाठी वाहून घेतलं. तपस्विनीसारखं समर्पित जीवन फार क्वचित पहायला मिळतं. लतादीदींनी लहानपणी हलाखीचे दिवस पाहिले. गरिबीतून वर येऊन, आपल्या भावंडांना मोठं करत त्यांनी सुरांची साधना अव्याहत सुरू ठेवली. या परिस्थितीतही सकारात्मक दृष्टीकोन ठेवून, काळाने केलेले आघात झेलत लतादीदींनी काळावरच मात केली. त्रिकालाबाधित रूपेरी पडद्यावर चांदण्यांची अक्षरं कोरली. लता मंगेशकर यांना गंधर्वानेही हेवा करावा अशी सुरेल आवाजाची देणगी लाभली. ही मधूर आवाजाची देणगी आणि स्वरांची अखंड पूजा या सगळ्याचा परिपाक म्हणून संगीतदेवतेनं त्यांना सम्राज्ञीपद बहाल केलं. आज मात्र या सर्व आठवणी बनल्या आहेत. आज त्या एका दूरच्या प्रवासाला निघून गेल्या आहेत.

कलावंताला वय नसतं तसंच संगीतकलेलाही वय नसतं. कारण, लताबाईंच्या कोणत्याही वयातली गाणी ऐकली तरी त्यांच्या पहिल्याच आवाजातलं सातत्य त्यांच्या स्वरयंत्रानी अखंड अबाधित ठेवलं आहे, हे जाणवतं. किंबहुना, सप्तसुरांनाच त्यांच्या स्वरयंत्रांशी दृढ संगत करावीशी वाटत राहिली असावी... सात वर्षांची मुलगी ते ७० वर्षांची वृद्ध महिला अशा प्रत्येकीला लतादीदींचा आवाज चपखल बसतो. परकाया प्रवेश या संकल्पनेप्रमाणे त्यांच्या आवाजात सर्वांना सामावून घेण्याची शक्ती आहे. लता मंगेशकर हा सुरांचा चमत्कार आहे. त्यांना आवाजाची दैवी देणगी लाभली आहे. त्यांच्या मधूर आवाजातली गाणी ऐकून चिमुरडी झोपी जातात. तरूणांना त्यांच्या



प्रीती गीतांची मोहिनी पडते. मध्यमवयीन लोकांना त्यांचा काळ आठवतो तर वृद्धांना त्यांच्या भावनांची अभिव्यक्ती होतेय असं वाटतं. सर्वांना आपलंसं करणार्या लतादीदींनी हजारांच्या घरात गाणी गायली. गाण्याप्रमाणेच लतादीदींच्या वागण्यातला साधेपणा कोणाच्याही नजरेत भरावा इतका उल्लेखनीय. केवळ लता मंगेशकरच नव्हे तर मंगेशकर घराण्याचेच संगीतक्षेत्रावर अनंत उपकार आहेत. वडिलांचं नाव द्विगुणित करणारी अनेक कलावंत मंडळी आहेत पण, मास्टर दीनानाथांचं गायनवैशिष्ट्य द्विगुणित नव्हे तर शतगुणित झाल्याचं मंगेशकर बंधु-भगिनींनी सिद्ध केलं आहे. लता मंगेशकर यांनी वडिलांची परंपरा पुढे चालवत रसिकांना पर्वणी दिली. आकड्यांमुळे रसिकांना त्यांचे वय उमगत राहिलं पण कलेने, स्वराने मात्र ते लक्षात ठेवलं नाही. म्हणूनच ही स्वरसम्राज्ञी चिरनूतन, चिरतरूण राहणार आहे

लता मंगेशकर हे नाव गेली साठहून अधिक वर्षं प्रकाशझोतामध्ये राहिलं. १९४७ मधला ङ्गआपकी सेवा मेफ ते २००१ चा मोहब्बते ही वाटचाल म्हणजे स्वरांची रोषणाई, माधुर्याची किमया की ङ्गकुदरत का करिश्माफ हे ज्याने त्याने आपापल्या मगदुराप्रमाणे ठरवायचं. आयेगा आनेवाला, आजा रे परदेसी, कही दीप जले कही दिल ही हॉंटींग सॉंग्ज असोत वा धीरे से आजा रे अखियन में निंदियासारखी लोरी, लता मंगेशकर यांचा स्वर कुठल्याही संवेदनक्षम माणसाच्या अंत:करणाला स्पर्श करुन गेलाय. पवन दिवानी (डॉ. विद्या-सचिन देव बर्मन) असो वा जा जा रे जा बालमवा (बसंत बहार-शंकर जयकिशन) लतादीदींच्या तरल भावोत्कट स्वरांची माधुरी जादू करुन गेली. अल्ला तेरो नाम (हम दोनो-जयदेव), ए मालिक तेरे बंदे हम (दो आँखे बारह हाथ-वसंत देसाई) ही तर प्रार्थना गीते बनून राहिलीत. ओ सजना बरखा बहार आई (परख-सलील चौधरी) असो वा नैना बरसे रिमझिम रिमझिम (वह कौन थी-मदन मोहन), रसिक बलमा, आजा सनम मधुर चाँदनी मे हम (चोरी चोरी-शंकर-जयकिशन) ही भिन्न ऋतूंचा प्रत्यय देणारी गाणी लताजीच गाऊ जाणे . वो चुप रहे तो मेरे दिल के दाग जलते है (जहाँ आरा-मदनमोहन), खेलो ना मेरे दिल से (हकीकत-मदनमोहन) या गझल लतादीदींच्या स्वरातून काळजाला स्पर्श करुन जातात. लताजींच्या बाबतीत स्थळ, काळ, वय जणू गोठून गेलंय. चुप चुप खडे हो, मेरा लाल दुपट्टा मलमल का, बात बात पे रुठो ना, काश्मिरकी कली हूँ मै या प्रत्येक गाण्यामध्ये लताजींचा स्वर नायिकेच्या अल्लड वयाशी जणू एकरुप झालाय. नर्गिस, मधुबाला, नूतन, मीना कुमारीपासून ऐश्वर्या, काजोलपर्यंत किती नायिकांना त्यांनी आवाज दिला, त्याची गणती करणं अवघड. उर्दू, हिंदीच नव्हे तर बंगाली, गुजराथी, मराठी अशा विविध भाषांमधून गात लतादीदी राष्ट्रीय एकात्मतेचं प्रतिक बनून गेल्या.

कळा ज्या लागल्या जीवा, मधु मागासी माझ्या सरत्या परि, जन पळभर म्हणतील हाय हाय या भा. रा. तांबे यांच्या भावोत्कट कविता दीदींच्या आवाजात स्वरशिल्पं बनल्या. घनश्याम सुंदरा, लटपट लटपट तुझं चालणं, प्रेमा काय देऊ तुला, जीवनात ही घडी ही मराठी चित्रपटगीतं एक अमोल ठेवा आहेत. 'ऐ मेरे वतन के लोगो' हे १९६२ च्या चिनी आक्रमणाच्या वेळचं गीत आजही डोळ्यात पाणी आणतं. त्यामुळेच 'भारतरत्न' पुरस्काराआधी लतादीदींना पद्मभूषण आणि दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं याचं आश्चर्य वाटत नाही. तीस हजारांहून जास्त गाणी गाऊन लतादीदी पार्श्वगायन क्षेत्रात 'मोनॉपॉली' नव्हे तर एक संस्थाच बनून गेल्या, अढळपदी जाऊन बसल्या. भारतरत्न पुरस्कार म्हणजे त्यांच्या देदीप्यमान सांगितीक कारकीर्दीचा कळसाध्याय म्हणायचा.

## लोकसंसद

### संगीतविश्वाचा कल्पवृक्ष लावूनिया दीदी गेल्या !

गेल्या तीन पिढ्या ज्यांचा अलौकिक दैवी स्वर समस्त भारतीयांच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला होता आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांच्या आयुष्यात तो स्वर्गीय स्वर गुंजत राहील त्या जगविख्यात गायिका गानसम्राज्ञी लता मंगेशकर, आपल्या सर्वांच्या लाडक्या लतादीदी आपल्याला सोडून गेल्या. गेले महिनाभर त्यांच्या प्रकृतीविषयी उलटसुलट बातम्या येत होत्या तेव्हापासूनच सर्वांना त्यांच्या प्रकृतीची काळजी लागून राहिली होती. पण शेवटी तो अलौकिक दैवी स्वराचा आनंदघन निखळला आणि प्रत्येकाचे मन शोकसागरात बुडाले. भारतरत्नासह असंख्य पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या व सात दशकांच्या आपल्या कारकिर्दीत अनेक ख्यातनाम संगीतकारांची चित्रपटांतील व विविध प्रकारची, विविध भाषांमधील ३० हजारांपेक्षा अधिक गाणी गाणाऱ्या लतादीदींनी कोट्यवधी भारतीय रसिकांचे भावविश्व समृद्ध केले. आज लतादीदी आपल्यातून देहरूपाने गेल्या असल्या तरी लतादीदींच्या आवाजाच्या जादुई स्वरांनी अजरामर झालेल्या हजारो गीतांच्या श्रवणातून त्यांच्या स्मृती अनंतकाळ रसिकांच्या मनात कायम जागृत राहणार आहेत. संगीतविश्वाचा कल्पवृक्ष लावून दीदी गेल्या आहेत.

**- प्रदीप शंकर मोरे**

### आजही शेतकरी उपेक्षितच!

नुकताच देशाच्या संसदेत २०२२/२०२३ चा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अंदाजपत्रक सादर केले हे बजेट श्रीमंतांसाठीच आहे असेच म्हणावे लागेल सर्वसामान्य,गरीब जनतेसाठी यात काहीच नाही वास्तविक पाहता दिवसेंदिवस महागाईचा आलेख उंचावत आहे त्यासाठी पहिल्यांदा दिलासा मिळेल असे वाटत असताना सर्वच घटकांना ठेंगा दाखविला आहे शेतकऱ्यांच्या दृष्टीने म्हणायचे झाले तर हा अर्थसंकल्प निराशाजनकच आहे अर्थमंत्र्यांनी शेती सुधारणेच्या नावाखाली स्वप्नांचा मनोरा बांधलेला असला तरी प्रत्यक्षात यामध्ये काहीच नाही कृषीक्षेत्रामध्ये डिजिटल क्रांती करण्याची भाषा अर्थमंत्री करत आहेत पण प्रत्यक्षामध्ये आज कृषी महाविद्यालयांची अवस्था दयनीय आहे नवीन कोणतीही माहिती नाही,पायाभूत सुविधा नाहीत,नवीन संशोधन नाही,शासकीय कृषी महाविद्यालयाऐवजी विद्यार्थी खासगी महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा कल वाढलेला आहे सन २०१६ साली याचं केंद्र सरकारने घोषणा केली होती की सन २०२२ ला शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार पण आज स्थिती उलटीच आहे २०१६ साली डिझेल ४५ रुपये लिटर होते ते आज ९५ रुपये लिटर आहे, पोटॅश ५८० रुपयाला एक गोणी होती ती आज १७०० रुपयाला मिळत आहे पीव्हीसी पाईपच्या किंमती दुप्पट झाल्या आहेत त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च दुप्पट झाला मग उत्पन्न कुठे दुप्पट झाले देशातील एकाही शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट झालेले नाही हेच वास्तव आहे!

**- राजू जाधव, मांगूर**

### त्यागमूर्ती रमाई

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत माता रमाईला जीवनात अनेक दु:खे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या.

माता रमाई या आयुष्यभर दु:खाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दु:ख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ जानेवारी १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दु:ख पचवणे अवघड गेले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयनतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, दौंड**




तात्पर्य:-अर्जुन युध्द करणार नव्हता व त्याऐवजी युध्दभूमीचा त्याग करून भिक्षाटन करण्यास जाणार होता हे समजल्यावर धृतराष्ट्राला नक्कीच आनंद झाला असला पाहिजे. पण शत्रूला मारण्याइतपत अर्जुन सक्षम आहे (परंतप) असे सांगून संजयाने धृतराष्ट्राची निराशा केली. थोड्या वेळापुरता जरी अर्जुन आपल्या कुटूंबावरील प्रेमामुळे व्याकूळ झाला होता तरी तो शिष्य म्हणून परमश्रेष्ठ आध्यात्मिक गुरू श्रीकृष्ण यांना शरण गेला. यावरून असे दिसून येते की, थोड्याच कालावधीत तो कौटुंबिक आसक्तीमुळे उत्पन्न झालेल्या मिथ्या शोकातून मुक्त होईल आणि आत्मसाक्षात्काराच्या ज्ञानाने किंवा कृष्णभावनेने परिपूर्ण होऊन निश्चितपणे युध्द करील. याप्रमाणे धृतराष्ट्राच्या आनंदात विरजणच पडेल, कारण श्रीकृष्णांनी अर्जुनाला ज्ञान प्रदान केल्यामुळे तो शेवटपर्यंत युध्दा करील.

**तमुवाच हृषीकेश: प्रहसन्निव भारत।**
**सेनयोरूभयोर्मध्ये विषीदन्तमिदं वच: ।।१०।।**

तम्-त्याला उद्देशून; उवाच-म्हणाले; हृषीकेश-इंद्रियांचे स्वामी श्रीकृष्ण; प्रहसन्-स्मितहास्य करीत; इव-जणू काय; भारत-भरवंशज हे धृतराष्ट्र; सेनयो-सैन्याच्या; उभयो:-दोन्ही बाजूंच्या; मध्ये-मध्ये; विषीदन्तम्-शोकमग्न; इदम्-पुढीलप्रमाणे; वय:-शब्द किंवा वचन.

**हे भरतवंशजा!त्या वेळी दोन्ही सैन्यांच्या मध्ये उभे राहून हास्य करीत श्रीकृष्ण, खिन्न झालेल्या अर्जुनाला याप्रमाणे म्हणाले.**

**(क्रमश:)**

**(भगवद्गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)**

श्रद्धांजली






# तुम से बिछड़ के चैन कहाँ हम पाएंगे



*१९८९ मध्ये एचएमव्हीने १९४० ते १९७५ मधील दुर्मिळ पण दर्जेदार गाण्यांचा 'यादों की मंझिल' नावाचा बारा कॅसेटचा अल्बम आणला. त्यातला अकरा नंबरच्या कॅसेटमध्ये 'महाराजा' नावाच्या सिनेमातल 'तुमसे बिछडकर चैन कहाँ हम पायेंगे' हे लताच गाणं ऐकलं आणि क्लीन बोल्ड. कायम्युजिक काय गायकी यार. दिल घायल. यापूर्वी कधी न ऐकलेलं त्यामुळे कोणालाच माहीत नसलेलं गीत. किती वेळा ऐकलं त्याचा नेमच नाही. भेटलेल्या प्रत्येक लताभक्ताला घरी बोलावून ऐकवायचो. तेव्हापासून हे गाणं किती वेळा ऐकलं असेल त्याचा काही हिशोबच नाही. गाण्याची सुरुवात अतिशय सौम्य स्वरात होते. 'तुम से बिछड़ के चैन कहाँ हम पाएंगे' मग तीच उत्तर देते 'होंगे जहाँ तुम...हम भी वहीं आ जाएंगे' आणि त्याला विचार ते पूछो क्यों!!! हाँ.. हाँ... हाँ..पूछो क्यौं. तू मला विचार हे लता ज्या आर्जवाने म्हणते, की काय बिशाद तो नाही विचारणार. यातले चार आर्जवी हाँ.. हाँ. केवळ लतालाच जमले. आणि मग स्वतःच उत्तर देते, तो हम ये कहेंगे.....के तुम होहमारी मंज़िल. या मधल्या मंजिलचा उच्चार आणि आर्त स्वर या गाण्याला एका वेगळ्याच उंचीवर नेतो. आता हे गाणं, त्याचे बोल, त्याचा व्हीडिओ सर्व इंटरनेटवर आहे. त्या काळी याचे बोल लिहून घ्यायला एकेक रात्र घालवली आहे. जरूर ऐका, तुमसे बिछड के चैन कहाँ हम पाएंगे...*

लता मंगेशकर हिंदी चित्रपटसृष्टीला पडलेलं एक अजरामर स्वप्न. जगातील सर्वाधिक रेकॉर्ड कलाकार म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये ललादिदींच्या नावे नोंदले गेले आहेत. त्यांनी १९४२ मध्ये करिअरला सुरुवात केली आणि सात दशकांपेक्षा अधिक काळपर्यंत त्यांनी रसिकांच्या मनावर राज्य केलं. लतादिदींनी एक हजाराहून अधिक हिंदी चित्रपटांसाठी गाणी रेकॉर्ड केल्याचे म्हटले जाते. ३६पेक्षा जास्त प्रादेशिक भारतीय भाषा आणि परदेशी भाषांमध्येही गायण्याचे श्रेय त्यांच्याकडे आहे. आशा भोसले, हृदयनाथ मंगेशकर, उषा मंगेशकर आणि मीना मंगेशकर या गायकांची मोठी बहीण लता मंगेशकर म्हणजे सर्वांचीच लतादिदी. सिनेक्षेत्रातील भारतातील सर्वोच्च पुरस्कार, दादासाहेब फाळके पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले.

### बालपण

लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर, १९२९ रोजी इंदूर, मध्य प्रांत (आता मध्य प्रदेश) येथे झाला. दीनानाथा आणि शेवंती मंगेशकर यांच्या पाच मुलांपैकी ती एक मोठी मुलगी होती. ती महाराष्ट्रातल्या ब्राह्मण कुटुंबातील होती. दीनानाथ गोव्यातील मंगेशी या गावचे. त्यांनी आपल्या गावाची ओळख करून देऊन त्यांचे आडनाव हरिडकर वरून मंगेशकर असे ठेवले. पंडित दीनानाथ मंगेशकर एक निपुण शास्त्रीय गायक आणि रंगमंच अभिनेते होते. सुरुवातीला लताचे नाव हेमा असे ठेवले गेले होते, परंतु नंतर तिच्या वडिलांनी त्यांचे एका नाटकातील पात्रातून प्रेरित होऊन त्यांचे नाव लता असे ठेवले. तिला चार भावंडे, तीन बहिणी, मीना, आशा आणि उषा; आणि एक भाऊ, हृदयनाथ. पाचही मंगेशकर भावंडांनी त्यांच्या वडिलांकडून शास्त्रीय संगीताचे धडे गिरविले.

वडिलांच्या संगीत नाटकांमध्ये लताने वयाच्या पाचव्या वर्षापासून अभिनय करण्यास सुरवात केली. अमानत खान, पंडित तुलसीदास शर्मा आणि अमन अली खान साहेबांसारख्या उस्तादांकडून त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडेही घेतले. त्यांना शाळेत न गेल्यामुळे औपचारिक शिक्षण मिळाले नाही. लता अवघ्या १३ वर्षाच्या असताना पंडित दिनानाथ यांचे निधन झाले आणि थोरल्या असल्याने कुटुंबाची आर्थिक जबाबदारी लताच्या खांद्यावर आली.

### करिअर :

लता मंगेशकर यांची विविध भूमिकांमध्ये उत्तम कारकीर्द आहे आणि इतरांपेक्षा ती चांगली आहे. ईश्वरी देणगी असलेल्या प्रतिभाशाली आवाजामुळे त्यांना सर्वात यशस्वी आणि प्रख्यात महिला पार्श्वगायिका म्हणून ओळख मिळवून दिली. वैजयंतीमालापासून प्रीती झिंटापर्यंत त्यांनी अनेक अभिनेत्रींसाठी पार्श्वगायन केले आहे. लतादिदींच्या गाण्यांनी काळ आणि भौगोलिक सीमा ओलांडून लाखो लोकांच्या हृदयाला स्पर्श केला होता. करिअरच्या सुरूवातीला त्यांनी काही चित्रपटांमध्ये अभिनयदेखील केला होता. संगीत दिग्दर्शक म्हणून त्यांचे प्रयत्न गायन कारकीर्दीइतके यशस्वी नव्हते.

### पार्श्वगायिका :

वडिलांच्या मृत्यूनंतर लताजींनी करिअरची सुरुवात केली. एका कर्नाटकी कौटुंबिक मैत्रिणीने तिला मराठी आणि हिंदी चित्रपटांमध्ये अभिनेत्री म्हणून नोकरी मिळवून दिली. तिच्या कारकिर्दीची सुरूवातीची वर्षं खूपच कठीण होती. पार्श्वगायिका म्हणून त्यांचे पहिले गाणे संगीतकार सदाशिवराव नेवरेकर यांच्यासह मराठी चित्रपटाचे नाचूया गडे, खेळू सारी मनी हौस भरारी हे होते. रिलीज होण्यापूर्वी हे गाणे चित्रपटातून काढून टाकले गेले. पुढचे वर्षी त्यांचे पहिले हिंदी गाणे गाजाभाऊ या सिनेमातील माता एक सपूत की दुनिया बादल दे, आले. लता मंगेशकर मुंबई येथे १९४५ मध्ये स्थायिक झाल्या. त्यावेळीच्या रसिकांच्या पसंतीस उतरणाऱ्या गायिकांच्या तुलनेत लतादिदींचा आवाज खूपच पातळ आणि तीक्ष्ण वाटला असल्याने त्यांना समकालीन संगीतकारांकडून अनेकदा नाकारले गेले. संगीत दिग्दर्शकांचे समाधान करण्यासाठी त्यांनी अनेकदा नूरजहांसारख्या प्रसिद्ध गायिकांचे अनुकरणही केले.

मास्टर विनायक व्यतिरिक्त, लता यांना संगीत दिग्दर्शक गुलाम हैदर यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली लताजींनी १९४८ मध्ये 'मजबूर' या चित्रपटातील 'दिल मेरा तोड़ा' या गाण्यात पहिली ओळख मिळविली. अभिनेत्री मधुबालाला महल या चित्रपटात आवाज दिल्यानंतर त्यांच्या गायकीने गदारोळ केला.

त्या काळातील सर्व प्रमुख संगीत दिग्दर्शक आणि पार्श्वगायकांसोबत काम करण्यास लता यांनी सुरुवात केली. सचिन देव बर्मन, सलील चौधरी, शंकर जयकिशन, नौशाद, मदन मोहन, कल्याणजी-आनंदजी, खय्याम आणि पंडित अमरनाथ हुसनलाल, भगत राम यासारख्या नामांकित संगीत दिग्दर्शकांसाठी त्यांनी पार्श्वगायन केले. ५० च्या दशकात त्यांनी बैजू बावरा, मदर इंडिया, देवदास, चोरीचोरी आणि मधुमती अशा यशस्वी चित्रपटांमध्ये काम केले. संगीत दिग्दर्शक सलील चौधरी यांच्यासमवेत मधुमती या चित्रपटाच्या गाण्यातील आजा रे परदेशी या गाण्यासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट महिला पार्श्वगायकाचा पहिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला होता. त्यांनी विविध संगीत दिग्दर्शकांसाठी सहजपणे भिन्न शैलींमध्ये गायन केले. 'बैजूबावरा' या चित्रपटाच्या राग भैरवीवर आधारित रागावर गाणे गायले. हम दोनो या चित्रपटासाठी अल्लाह तेरो नाम सारखे भजन त्यांनी गायले. सर्वात ग्लॅमरस हिरोइन्समागील त्यांच आवाज रसिकांवर जादू करीत होता. ए मेरे वतन के लोगो' या प्रसिद्ध देशभक्तीपर गाण्याने पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंसह मान्यवरांना अश्रू अनावर केले. त्यांनी तमिळ आणि मराठी भाषेत प्रादेशिक चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले. वानरधाम या चित्रपटात त्यांनी तामिळ भाषेतील पहिले गाणे गायले. मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी भाऊ हृदयनाथ मंगेशकर यांच्यासाठी जैत रे जैत सारख्या चित्रपटात आवाज दिला. सलिल चौधरी आणि हेमंत कुमार यांच्यासारख्या संगीत दिग्दर्शकांसाठी त्यांनी बंगाली चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले. क्रांतिवेरा सांगोली रायना या चित्रपटाच्या लक्ष्मण बेर्लेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या गाण्याने कन्नड प्लेबॅक इंडस्ट्रीमध्ये त्यांनी पदार्पण केले. सलिल चौधरी यांनी संगीतबद्ध केलेले नेल्लू या चित्रपटासाठी गाणी रेकॉर्ड केली.

मोहम्मद रफी, किशोर कुमार, मुकेश, हेमंत कुमार, महेंद्र कपूर आणि मन्ना डे यांच्यासारख्या नामांकित पुरुष पार्श्वगायकांसह त्यांचा हा संगीताचा प्रवास अविरत सुरु होता. प्लेबॅक इंडस्ट्रीची अतुलनीय राणी म्हणून त्यांची कारकिर्द बहरली. मिळाला.

१९८० च्या दशकात लताजींनी सचिन देव बर्मनचा मुलगा राहुल देव बर्मन यांच्या रचनांवर काम केले. आपल्या बहुमुखी रचनांसाठी आशा भोसले यांना प्राधान्य देणाऱ्या आरडीने रॉकी मधील 'क्या याही प्यार है यासारख्या सुमधुर रचनांसाठी लताजींचा आवाज वापरला. संगीत दिग्दर्शक जोडी लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या रचना त्या काळात सुपरहिट ठरल्या त्या केवळ लता यांच्या आवाजामुळे. १९९० नंतर लताजींनी अनु मलिक, जतिन ललित आणि ए. आर. रेहमान सारख्या संगीत दिग्दर्शकांसोबत काम केले. दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे, हम आपके हैं कौन, दिल से, रंग दे बसंती सारख्या चित्रपटांमध्ये लताजींनी गायलेली प्रशंसनीय गाणी सादर केली. आरोग्याच्या कारणांमुळे, निवडक रचना गात असल्यामुळे त्यांनी हळूहळू गायन कमी केले. संगीत कारकिर्दीत त्यांनी अनेक अल्बमही केले. लता मंगेशकर यांनी अनेक मराठी चित्रपटांसाठी संगीत दिग्दर्शकाची भूमिकाही स्वीकारली. राम राम पावणे हा त्यातील पहिला चित्रपट. मराठा तितुका मेळवावा, मोहित्यांची मंजुळा, साधी माणसे, तांबडी माती या चित्रपटांचाही समावेश आहे. निर्माती म्हणून लता मंगेशकर यांनी १९९५ मध्ये वादळ या मराठी भाषेचा चित्रपट काढला.

### पुरस्कार आणि सन्मान :

लताजी यांना पार्श्वगायिका म्हणून विलक्षण कारकीर्दीसाठी अनेक पुरस्कार व सन्मान मिळालेले आहेत. पद्मभूषण, दादासाहेब फाळके पुरस्कार, पद्म विभूषण, महाराष्ट्र भूषण पुरस्कार, एनटीआर नॅशनल अवॉर्ड, आणि एएनआर नॅशनल अवॉर्ड. २००१ मध्ये त्यांना भारतरत्न या सर्वोच्च नागरिक पुरस्काराने सन्मानित केले गेले. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, बंगाल फिल्म जर्नलिस्ट असोसिएशन अवॉर्डही त्यांनी मिळविले. तिने सर्वोत्कृष्ट महिला पार्श्वगायकासाठी फिल्मफेअर पुरस्कार चार वेळा जिंकला आहे. १९९३ मध्ये त्यांना फिल्मफेअर लाइफटाइम अचिव्हमेंट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. ■



नाम गुम जायेगा, चेहरा ये बदल जायेगा मेरी आवाज़ ही,
पहचान है गर याद रहे वक़्त के सितम, कम हसीं नहीं
आज हैं यहाँ, कल कहीं नहीं वक़्त से भरे अगर, मिल गये

## मेरी आवाज ही...

लता मंगेशकर म्हणजे संगीत व भारताचा अनमोल ठेवा. एखाद दुसऱ्या गाण्यांमुळे काही गायीका प्रकाशझोतात येतात तर काही आवाज असे असतात की त्या आवाजामुळे ते गाणं लोकप्रिय होतं. तसाच प्रकार लताजींच्या बाबतीत झाला. त्यांच्या अवीट गोडीच्या आवाजामुळे बरीचशी गाणी आजही लोकप्रियतेच्या शिखरावर टिकून आहे. ए मालिक तेरे बंदे हम हे लताजींनी गायलेली प्रार्थना म्हणजे नैतिकता, श्रध्दा व तत्त्वज्ञानाचे उत्तम उदाहरण. जेव्हा या संकल्पना एखाद्या अधिकारीक व्यक्तीच्या तोंडून आपण ऐकतो तेव्हा त्या आयुष्याच्या खडतर वाटचालीवर खूप प्रेरणादायी ठरतात.

या प्रार्थनेत देव, अल्ला, गॉड असे शब्द न घेता, मालिक हा अत्यंत समर्पक शब्द वापरुन या गाण्याने धर्म, जाती व देशाच्या सीमा ओलांडल्या आहे. मानवाने कितीही प्रगती केली तरी आम्हांला अगतिकतेचा प्रत्यय वारंवार येतो. देव म्हणा की निसर्ग, ही अशी एक अलौकिक शक्ती आहे, ज्याच्यासमोर आम्हांला शरणागताचा भाव अर्पण करुन नतमस्तक व्हावेच लागते. देवावर किंवा कर्मावर श्रध्दा ठेवावीच लागते. हे गीत आम्हांला कार्य आणि सत्कर्मातला फरक दर्शविते. एखाद्या कृतीला नैतिकतेची जोड मिळाली की ते सत्कर्म ठरते. सत्कर्माच्या वाटेवर संत तुकाराम महाराजाप्रमाणे न मृत्यूचं भय असतं, न अपूर्ण इच्छा आणि आमचा शेवटचा दिस सर्वार्थाने गोड होतो. कितीही संकटे,विपरीत परिस्थिती आली तरीसुद्धा माणसाने आपला संयम, संघर्ष व चांगुलपणा कधीच सोडायचा नसतो. कोमलतेने घातलेली आर्त हाक थेट हृदयात सामावते म्हणूनच या प्रार्थनेत भैरवी रागाचे कोमल स्वर घेतले असावेत. आपण संकटात सापडलो की देवाला साकडे घालतो, काहीतरी मागतो, पण देवाला काहीच मागायचे नसते. सापेक्ष भक्ती न करता सदैव कर्म, ज्ञान व भक्तीमार्गावर निरपेक्ष भावनेनी वाटचाल करायची असते. प्रत्येकाच्या आयुष्यातील रोग,भोग व योग हे ठरलेले असतात.जे व्हायचे आहे ते होणारच,त्याला कोणीही रोखू शकत नाही,पण ही प्रार्थना आम्हांला मानसिक बळ देते व जीवन जगण्याची कला शिकविते. स्वामी रामकृष्ण परमहंसांना कर्करोग झाल्याने त्यांना अतोनात शारीरिक वेदना होत होत्या पण याही स्थितीत ते मानसिकरित्या ढासळले नव्हते. त्यांच्या शिष्यांनी त्यांना याबाबत विचारले तर ते म्हणाले कर्करोग माझ्या शरीराला झाला आहे,मनाला नाही. लता मंगेशकर यांनी गायलेली ही प्रार्थना म्हणजे मनाच्या स्थिरतेची पहिली पायरी होय.

लतादिदींच्या शेकडो गाण्यांमधून एक आवडते गाणे शोधायचे यापेक्षा एव्हरेस्टवरून उडी मारणे सोपे आहे. लतादीदींची अशी कितीही गाणी असली तरी एखादे गाणे जास्त जवळचे वाटते. ते ही ते आपल्या आवडत्या चित्रपटातील असावे, आपल्या आवडत्या नायक- नायिकेवर चित्रित झालेले असावे अशी अट वाचल्यानंतर मात्र मार्ग स्वच्छ दिसू लागला आणि डोळ्यांपूढे अमर प्रेम चित्रपटातील, शर्मिला टागोर आणि राजेश खन्ना यांच्यावर चित्रित झालेले आणि लतादीदींनी आपल्या स्वर्गीय आवाजात गायलेले, रैना बीती जायें हे सुमधुर गाणे आले. १९७२ मध्ये निर्माता-दिग्दर्शक शक्ती सामंता, गीतकार आनंद बक्षी आणि संगीतकार आर डी बर्मन या त्रिवेणी संगमामधून हे अमर गीत जन्माला आले होते. रात्रीच्या वेळेस शराब पिलेला, एक चांगल्या, सुसंकृत, सुखवस्तू, पण विवाहित असुनही पत्नीच्या प्रेमाला पारखा झालेला माणूस, आनंद बाबू (राजेश खन्ना) घोडागाडीमध्ये बसण्यासाठी आपला पाय उचलतो आणि त्याच वेळेस त्याच्या कानावर तोडीमधील रैना बीती जायें हे सुमधूर सूर येतात आणि त्याचा पाय वर उचलतच नाही. तो स्वतः एक संगीतप्रेमी आणि प्रेमाचा भुकेला असल्याने, या आवाजाच्या रोखाने त्याची पावले आपोआपच वळू लागतात आणि पहिल्या मजल्यावरील एका खोलीचे दार उघडून तो आत जातो. या दृष्यामध्ये राजेश खन्ना आणि शर्मिला टागोर यांच्या अप्रतिम अभिनयाला गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी आपल्या स्वर्गीय आवाजाने सोनेरी वेष्टन घातले आहे. आर. डी. बर्मन यांनी तर या गीताला अवर्णनीय अशा संगीतामध्ये बांधून, संगीतप्रेमींपुढे एक दौलतीचा खजिनाच मोकळा केला आहे, मुक्तहस्ताने लूटण्यासाठी ! आचार्य अत्रेंनी गानकोकिळा म्हणून गौरवलेल्या, भारतरत्न संगीत सम्राज्ञी, लता मंगेशकर, या कालातीत गायिका ठरतत. नुकताच त्यांनी २८ सप्टेंबर रोजी वाढदिवस साजरा केला होता. अवीट आवाजाने समाजाला मोहिनी घालणाऱ्या, त्यांना अजून आयुष्य मिळायला हवे होते.

सारे मंगेशकर कुटुंब म्हणजे साक्षात सरस्वतीची कृपा असलेला चमत्कार. आशाताई आणि लताताई या दोन्हींपैकी कोणाची गायकी जास्त आवडते, कित्येक वर्ष या प्रश्नाचे उत्तर शोधत होतो; पण साने गुरुजींनच्या भाषेत सांगायच झालं तर लतादीदींचे चाहते हे पूजक आहे, आणि आशाताईंचे फ़ॅन आहेत. ■

## अमृतलतेची स्वरधारा

स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर. भारतीय चित्रपटसृष्टीतील पार्श्वगायनाच्या इतिहासातील एक सुवर्णपान. लतादीदींच्या स्वर्गीय स्वरांना कळीकाळाची, प्रांतांची, देशांच्या सीमांची मर्यादा कधीच भासली नाही. या स्वरांना कोंदण होते ते केवळ उत्कटतेचे, भव्यतेचे! लता मंगेशकर हा भारतीयांच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग होत्या आणि राहणार आहेत. मग हा भारतीय आपल्याच मायदेशात राहत असो वा विदेशात स्थायिक झालेला असो. जगाच्या पाठीवर जिथे जिथे भारतीय माणूस वसलेला आहे, तिथे तिथे तो लता मंगेशकर यांचा स्वर सोबत घेऊन गेला आहे.

भारतीय चित्रपटसृष्टीला ज्या वेळेपासून जगाला कवेत घ्यायचे वेध लागायला लागले, त्या वेळी तिच्याकडे अनेक नामवंत नायक, नायिका हे अग्रदूत म्हणून पाहत होतेच; पण लता मंगेशकर नावाची व्यक्ती एखाद्या विशाल छत्रासारखी या सा-यांवर मायेची सावली धरून होती.

आमच्या शेजारी बेंडखळे आडनावाचे कुटुंब राहायचे. त्यांच्याकडे असलेल्या रेडिओवर हिंदी चित्रपटगीते सतत वाजत असायची. त्या रेडिओच्या माध्यमातून पहिल्यांदा लता मंगेशकर यांचा सुरेल आवाज माझ्या कानी पडला. सात-आठ वर्षे वयाचा असताना मला त्या गाण्यांचा अर्थ काही कळायचा नाही, पण पुढे जसजसा मोठा होत गेलो, तसतसा लतादीदींचा स्वर अधिक कान देऊन ऐकू लागलो. त्यांनी म्हटलेल्या गाण्यांतल्या शब्दछटा, भाव हळूहळू समजू लागले.

गिरणगावामध्ये गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, आंबेडकर जयंती आदी महत्त्वाच्या प्रसंगी लाऊडस्पीकरवर गाणी वाजवण्याची प्रथा होती. त्या वेळी ऐकलेली अनेक हिंदी व मराठी गाणी माझ्या रोमारोमांत भिनली. त्याशिवाय रस्त्यावर १६ एमएम चित्रपट दाखविले जायचे. त्या वेळी तिथे पाहिलेल्या मराठी, हिंदी चित्रपटांचा व त्यातील गाण्यांचा विलक्षण परिणाम मनावर बिंबला गेला. 'रसिक बलमा...', 'चुप चुप खडे हो जरूर कोई बात है', असो; वा 'देव जरी मज कधी भेटला', 'अखेरचा हा तुला दंडवत' अशी लतादीदींची एकाहून एक सरस गाणी ऐकताना माझे कान सुपाएवढे होत असत. 'गंगा यमुना डोळ्यांत उभ्या का?' हे स्वरलतेचे गाणे ऐकताना आधी डोळ्यांसमोर वधूपिता उभा राहायचा, त्यानंतर माहेरहून सासरला चाललेली त्याची लेक दिसायला लागायची, मग वऱ्हाडी मंडळी... असा सगळा माहोल डोळ्यासमोर उभा करण्याचे सामर्थ्य आहे, लतादीदींच्या आवाजात. अशी कितीतरी गाणी सांगू शकेन, जी माझ्या मनात सातत्याने रुंजी घालत असतात. हिंदी असो वा मराठी चित्रपटसृष्टी, त्यातील प्रत्येक नायिकेचे एक वेगळे वैशिष्ट्य होते. मीनाकुमारी म्हणजे मूर्तिमंत कारुण्य, मधुबाला म्हणजे स्वर्गीय सौंदर्याचा आविष्कार, नर्गिस ही काहीशी अवखळ... पडद्यावर जी नायिका गाणे सादर करणार असेल तिची अभिनयशैली, लकबी, तिच्या बोलण्याच्या आवाजाचा पोत हे सारे लक्षात घेऊन दीदी गात. त्यामुळे पडद्यावर ती अभिनेत्री गात आहे, असे वाटावे; इतके गाणे जिवंत भासते. २००४ मध्ये अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त लतादीदींची ७५ गाणी सादर करणारा 'अमृतलता' हा कार्यक्रम 'चौरंग' संस्थेतर्फे सादर होत असे. 'अमृतलता'चा पहिला प्रयोग झाला २२ जानेवारी २००४ रोजी सांगली येथील तरुण भारत स्टेडियममध्ये. त्यानंतर पुढचा प्रयोग प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिर येथे केला. त्यानंतर इंदूर, उज्जैन, कोलकाता, झारखंड, दिल्ली, गोवा, रायपूर, पुणे, गांधीनगर असा प्रवास करत करत अमृतलता कार्यक्रमाने आता साडेतीनशे प्रयोगांचा आकडा गाठलेला आहे. ■



# नेरळमधील भाताचे गोडाऊन फुल्ल

## भात खरेदी केंद्रावर पोत्यांचे ढीग

## कळंब गोडाऊन अजूनही भरलेलेच

। नेरळ। वार्ताहर।

कर्जत तालुक्यातील भाताची शेती करणारे शेतकरी यांनी पिकवलेला भात शासनाच्या आधारभूत किमतीने खरेदी केले जाते. कर्जत आणि नेरळ येथे शेतकर्‍यांचा भात मोठ्या प्रमाणात पोहचले असून, त्यामुले शासनाची गोडाऊन पूर्ण भरले आहेत. त्यामुळे कर्जत आणि नेरळ येथे शासनाने नवीन गोडाऊन बांधावे तसेच कळंब येथील भाताच्या पोत्यांनी भरलेले गोडाऊन रिकामे करून द्यावे, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.



शासनाच्या मार्केटिंग फेडरेशन च्या माध्यमातून भाताची आधारभूत किमतीने खरेदी केली जाते. शेतकर्‍यांकडून भाताची खरेदी कर्जत तालुक्यात कर्जत, कडाव आणि नेरळ येथील शासनाने नियुक्त केलेल्या संस्थांकडून केली जात आहे. मात्र कर्जत येथील खरेदी विक्री संघ आणि नेरळ येथील विविध विकास कार्यकारी सोसायटी यांच्याकडून भाताची हमी भावाने खरेदी उपक्रमास शेतकर्‍यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे कर्जत येथील दोन्ही शासनाची गोदामे भाताच्या पोत्यांनी भरून गेली आहेत. तर, नेरळ येथील एकमेव गोदामदेखील भाताने भरून गेले आहे. त्यामुळे भाताच्या पोटी गोदामाच्या बाहेर ठेवली जात आहेत. बदललले हवामान यामुळे पाऊस कधीही येण्याची शक्यता असते. त्यामुळे गोडाऊन बाहेर ठेवलेली भाताची पोटी यावेळी येणाऱ्या पावसाच्या पाण्यात भिजण्याची शक्यता आहे.त्यामुळे शासनाने गोळा झालेला भात येथून उचलून न्यावा आणि संभाव्य धोका टाळावा अशी सूचना शेतकरी करीत आहेत.

### नवीन गोदाम बांधा

शासनाने भाताची गोदामे कमी पडत असल्याची परिस्थिती लक्षात घेऊन भाताची साठवण करण्यासाठी नव्याने गोदामे बांधावी, अशी मागणी नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटी आणि कर्जत खरेदी विक्री संघाने तहसीलदार यांच्याकडे केली आहे. नेरळ सोसायटी कडे तर एकच गोदाम सध्या उपलब्ध आहे, त्यामुळे कळंब येथे असलेले शासकीय गोदाम खुले करण्याची मागणी केली आहे. कळंब येथील गोदामात गेल्या वर्षी खरेदी करण्यात आणलेले भात अजूनही पडून आहे. ते उचलल्यास साधारण २५०० क्विंटल भाताची साठवण तेथे होऊ शकते आणि त्यामुले भाताची खरेदी देखील होऊ शकते, अशी माहिती शेतकरी देत आहेत.

## महत्त्वाचे

### कुत्र्याच्या पिल्लांचा विषबाधेने मृत्यू

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुड तालुक्यातील काशिद बीच तलवारवाडी दर्याजवळ विषारी औषध खाल्ल्याने कुत्र्याच्या पाच पिल्लांचा मृत्यू झाला असून, कोणीतरी अज्ञाताने विषारी औषध टाकल्याचा संशय व्यक्त केला जात असून, नांदगाव येथील प्राणीमित्र रोझलिन परेरा यांच्याकडील स्वप्नील सांगळे यांनी अज्ञाताविरोधात मुरुड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सदरचे वृत्त समजताच मुरुड तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ. सुदर्शन पाडावे यांच्या मार्गदर्शनाखाली पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विनायक पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन कुत्र्याच्या पाच पिल्लांचे शवविच्छेदन करण्यात येऊन पुढील तपासणीसाठी पोलिसांमार्फत मुंबई येथील फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले.

### माघी उत्सवाची यशस्वी सांगता

। रसायनी । वार्ताहर ।

माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने मोहोपाडा येथील हरेश विजय म्हस्कर व सुबोध विजय म्हस्कर यांच्या निवासस्थानी दीड दिवसांच्या श्रीगणेशाचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी गणेश पूजन, आरती, हरिपाठ, दीड दिवस सर्वांसाठी महाप्रसाद आदी कार्यक्रम पार पडले. सावळे येथील गायिका कुमारी माळीने उत्तम असे भजन गाऊन, त्याचबरोबर मृदंगमणी नितीन माळी यांनी उत्तम साथ देऊन ग्रामस्थांना मंत्रमुग्ध केले.

### रस्त्यावरील सर्व मोऱ्या नादुरुस्त

। चौल । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील वरंडे-देवघर या मुख्य रस्त्यावरील सर्व मोऱ्यांना मोठ मोठे खड्डे पडले असून, याठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु, या गंभीर बाबीकडे अद्याप सार्वजनिक विभागाने लक्ष दिलेले नाही. त्यामुळे या रस्त्यावरुन जाणाऱ्या नागरिकांसह वाहनचालकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे.

## रोहा-कुडली येथे दीपोत्सवाचे आयोजन

। सुतारवाडी । वार्ताहर ।

श्रीक्षेत्र स्वामी समर्थ सेवा परिवार चॅरिटेबल ट्रस्ट संचालित स्वामी समर्थ मंदिर कुडली (ता. रोहा) येथे दि. १६ ते १७ फेब्रुवारी असे दोन दिवस २० व्या वर्धापन दिनानिमित्त गुरुप्रतिपदा उत्सव आणि सहस्त्र दीपोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे अध्यक्ष सोनूबुवा उर्फ विष्णू पडवळ यांनी सांगितले. यानिमित्त दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष सोनाबुवा पडवळ, उपाध्यक्ष ॲड. बापूसाहेब पडवळ, सचिव विजय कामथेकर उपसचिव रामदास सरफळे, खजिनदार बळीराम महाडिक, उपखजिनदार विजय वांजले, कार्याध्यक्ष तुषार मोरे, मंदिर व्यवस्थापक तात्याराम कटे तसेच सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.

## नेरळकरांना स्टेशन आळीच्या गणेशाचे आकर्षण

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील रेल्वे स्टेशन परिसरात असलेल्या स्टेशन आळी भागातील विघ्नहर्ता मित्र मंडळाकडून माघी गणेशोत्सव साजरा केला जातो. दरम्यान, मंडळाकडून सामाजिक उपक्रम आयोजित करून हा उत्सव साजरा केला जात आहे.



विघ्नहर्ता या नावाप्रमाणेच हा गणपती नेरळकरांच्या श्रद्धास्थान बनला आहे. त्यामुळे भक्तांचीदेखील गर्दी दर्शनासाठी असली तरी कोरोनाचे नियम आणि निर्बंध लक्षात घेऊन सांस्कृतिक कार्यक्रम, भंडारा हे सोहळे यावर्षीदेखील विघ्नहर्ता मित्र मंडळाने आयोजित केले नाहीत.

## कर्जत चारफाट्यावर बर्निंग कारचा थरार

। कर्जत । वार्ताहर ।

कल्याण येथून लोणावळा येथे निघालेली फोर्ड कंपनीची डटसन गाडी कर्जत येथील चार फाटा येथे जळून खाक झाली.



कल्याण येथील चिकन घर येथे राहणारे किरण मोतीराम भोईर हे फोर्ड कंपनीच्या डटसन गाडीतून (एम एच ०४ -जी जे ९७३३) आपल्या शेजारी राहणारे रजनीश चौबे यांना लोणावळा येथे डायलिसिससाठी घेऊन चालले होते. परंतु, कर्जत चार फाटा येथे आल्यावर गाडीच्या बोनेटमधून धूर येऊ लागला म्हणून किरण भोईर यांनी बोनेट उघडले, तर गाडीच्या इंजिनमध्ये थोडासा पेट घेतला होता. बघता-बघता गाडीने अधिकच पेट घेतला. ही घटना सायंकाळी साडेपाच सुमारास घडली.

गाडीच्या अग्नितांडवामुळे चार फाट्यावरील वाहतूक सुमारे एक तास बंद होती. कर्जत नगरपरिषदेच्या अग्निशमन गाडीला पाचारण करण्यात आले व त्यांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत गाडी जळून खाक झाली होती. चार फाट्यावर ट्राफिक जाम झाल्याने कर्जत पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की व पोलीस कर्मचारी यांनी वाहतूक पूर्वपदावर आणण्यासाठी प्रयत्न केले.

## जमिनीत जबरदस्तीने अतिक्रमण

## जाब विचारणाऱ्या आदिवासी महिलेला जीवघेणी मारहाण

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील आदिवासी खातेदाराच्या नावे असलेली जमीन परस्पर बिगर आदिवासी व्यक्तीच्या नावे करण्यात आली आहे. त्याबद्दल जाब विचारण्यास आदिवासी खातेदार गेले असता तेथे जमिनीचे सपाटीकरण करण्याचे काम करणाऱ्या तरुणांनी आदिवासी महिलेला रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण केली. तसेच आदिवासी समाजाबाबत अपशब्द वापरल्याबद्दल नेरळ पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला आहे.



### आरोपींविरोधात पोलिसात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

तालुक्यातील ताडवाडी येथील खंडवी या आदिवासी शेतकऱ्याची जमीन असून, ती जमीन त्यांनी कोणत्याही व्यक्तीला किंवा बिगर आदिवासी शेतकरी यांना विकली नाही. त्याचवेळी सदर जमिनीच्या सातबारा उताऱ्यावरुन त्यांचे नाव आपोआप गायब झाले. त्याबद्दल त्यांच्याकडून महसूल विभागाकडे अर्जदेखील केला आहे. मात्र, त्या जमिनीमध्ये खोदकाम आणि त्या जमिनीचे सपाटीकरण करण्याचे काम खासगी लोकांकडून सुरु आहे. त्याबद्दल शेतकरी खंडवी यांनी नेरळ पोलीस ठाण्यात आपले म्हणणे तीन दिवस आधी जाऊन मांडले होते. मात्र, त्यानंतर पोलिसांनी जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींना बोलावून समज देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, पोलिसांकडून दिलेले आश्वासन पाळले गेले नाही.

ताडवाडी येथील सर्वे नंबर३३/२ ही मध्ये एक्झबींया कंपनीचे दोन जेसीबी खोदकाम करीत होते. त्यावेळी जमिनीच्या मालक तुलसाबाई खंडवी यांनी जेसीबी चालक यांना सदरची जागा आमची आहे असे सांगून काम बंद करण्यास सांगितले होते.

त्यावेळी तेथे असलेल्या पाच अनोळखी तरुणांनी गैरकायद्याची मंडळी एकत्र येऊन सदरचे काम बंद करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तुळसाबाई खंडवी आणि रंजना प्रकाश खंडवी प्रथम शिवीगाळ आणि नंतर हाताबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळी व दमदाटी केली. नेरळ पोलीस ठाण्यात अमोल पाटील आणि गणेश घोडविंदे याच्यासह अन्य चार ते पाच अनोळखी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कब्रस्थानच्या संरक्षण भिंतीसाठी निधी मंजूर

। कर्जत । वार्ताहर ।

नेरळ प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या ममदापूर येथील कब्रस्थान संरक्षण भिंत बांधणे याकरिता ३८.९० लक्ष निधी मंजूर करण्यात आला आहे.

नेरळ प्राधिकरण हद्दीतील मौजे ममदापुर येथे मोठ्या प्रमाणात मुस्लिम वस्ती असून, तेथील नागरिकांची वारंवार कब्रस्थानसाठी संरक्षण भिंत व्हावी ही मागणी करण्यात येत होती. सर्व घटकाला समान न्याय देणारे तसेच समाजाचा विकास व्हावा या दृष्टीने प्रयत्न करणारे राजिप उपाध्यक्ष यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून



ममदापूर येथे कब्रस्थान संरक्षण भिंत बांधण्यासाठी ३८.९० लाखांचा निधी मंजूर केला आहे. कामाचे भूमीपूजन रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी रा.जि.प. माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, बंधू देशमुख, दामतचे सरपंच जबिरभाई नजे, महिलाध्यक्षा ॲड.रंजना धुळे, दामतच्या उपसरपंच नयना आखाडे, वदपच्या माजी उपसरपंच मनीषा पाटील, कविता शिंगवा, वीरेंद्र जाधव, प्रसाद भोपतराव, इम्तियाज पौंजेकर आदी उपस्थित होते.

## श्रीवर्धन येथे हळदीकुंकू समारंभ



। श्रीवर्धन । वार्ताहर ।

शहरात राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे श्रीवर्धन शहरातील नगरपरिषद शाळा क्रमांक एकमध्ये हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. शनिवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजता संपन्न झालेल्या कार्यक्रमास महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या उपस्थितीमुळे रंगत आली. यावेळी महिलांसाठी उखाणे, गाण्यांच्या भेंड्या, कमी वेळात फुगे फुगवणे, बालदीत चेंडू टाकणे असे वेगवेगळे मनोरंजक खेळ ठेवण्यात आले होते. होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या उखाण्यांच्या स्पर्धेत सिध्दी करंजकर यांना पैठणीचा मान मिळाला. या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी रायगड जिल्हा युवती अध्यक्षा सायली दळवी, प्रवीता माने, ऋतुजा भोसले विशेष मेहनत घेतली.

## ढाक बहिरी येथून दरीत पडून ट्रेकर्सचा मृत्यू

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत आणि मावळ तालुक्याच्या सीमेवर असलेल्या ढाक बहिरी या गडावर ट्रेकर्स ट्रेकिंगसाठी येत असतात. ५ फेब्रुवारी रोजी औरंगाबाद येथील पाच ट्रेकर्स ट्रेकिंगचा आनंद घेण्यासाठी आले असता त्यापैकी प्रतीक आवळे हा ट्रेकर्स दरीत पडला होता. दरम्यान, यशवंती हायकर्स आणि स्थानिक हायकर्स यांनी त्या तरुणाचा मृतदेह रात्री बाहेर काढला.

ढाक बहिरी हा गड कर्जत आणि मावळ तालुक्याला लागलेला सुळका असून, औरंगाबाद येथील प्रतीक आवळे, पंकज गावदाडे, सुजित लहाने अभिशेख शेजुळ, सागर जैस्वाल हे ट्रेकसाठी गेले होते. दुपारी ३.३० च्या सुमारास ही घडली. त्याबाबत माहिती पोलिसांच्या माध्यमातून हायकर्स यांना मिळताच मदतीसाठी धावपळ सुरू झाली.

कर्जत येथील हायकर्स संतोष दगडे आणि त्यांची टीम तसेच खोपोली येथून यशवंती हायकर्सची टीम साहित्यासह ढाक च्या डोंगरावर पोहोचले. तुषार महाडिक व भारत रायकर या ट्रेकर्सनी मयत प्रतीकचा मृतदेह सुरक्षित बाहेर काढला.

या रेस्क्यूमध्ये सांडशी गाव येथील ऋषिकेश कदम, किरण शिर्के, संकेत कदम, संदेश शिर्के, मंगेश तुरडे, रोशन पेडणेकर, हरी ठोंबरे, लखन जाधव, गणेश मुकणे, गणेश सोमनाथ यांची कर्जतचे हायकर्स संतोष दगडे आणि त्यांच्या टीमला मदत झाली. त्याचवेळी खोपोली येथील यशवंती हायकर्सचे पद्माकर गायकवाड, महेंद्र भंडारे, अरविंद पाटील, अभिजित घरत, सौरभ रावल यांनी मदतीसाठी ढाक बहिरी गाठले होते.

## ताईसाहेब महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

। नागोठणे । वार्ताहर ।

नागोठण्याजवळील आमडोशी येथील सदानंदाश्रम मठ येथे शनिवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता पाली येथील सुयोग गोविलकर गुरुजी यांनी होमहवन व विधीवत पूजाअर्चा करून इंचगिरी संप्रदायाच्या सद्गुरू ताईसाहेब महाराज यांची अमृत शिलेमध्ये बनलेल्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना माऊलींचे परमशिष्य सदानंदाश्रम मठाचे मठाधिपती गुरुवर्य, गुरूदास अनंत महाराज यांच्या हस्ते करण्यात आली. या कार्यक्रमांस कोल्हापूरचे स.स. आनंदसिद्ध महाराज, चिपळूणचे हभप आप्पा पांचाळ महाराज, देवरुखचे स.भ. लोकम गुरुजी, पुण्याच्या गुरुभगिनी उषाताई कुलकर्णी यांची मदत झाली. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उकरुळमध्ये विविध विकासकामांचे भूमीपूजन



। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील उकरूळ ग्रामपंचायतीमध्ये विकासकामांचा धडाकासुरुआहे.याग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध प्रकारच्या ३८ लाखांच्या निधीमधून पूर्ण झालेल्या विकासकामांचे लोकार्पण करण्यात आले. तर, ग्रामपंचायत हद्दीत नव्याने ५६ लाखांची विकासकामे मंजूर झाली आहेत, त्यांचे भूमीपूजन करण्यात आले. तर ग्रामपंचायतीच्या निधीमधून साडे एकोणीस लाखांची कामे सुरु करण्यात आली.

याप्रसंगी राजिप उपाध्यक्ष सुधाकर घारे, माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती एकनाथ धुळे, माजी नगराध्यक्ष राजेश लाड यांच्यासह राष्ट्रवादी युवकचे तालुका अध्यक्ष सागर शेळके, महिला तालुका अध्यक्ष रंजना धुळे, दहिवली सरपंच चिंधु तरे, आसल सरपंच रमेश लदगे, शेकाप पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष वैभव भगत, चिंचवली माजी उपसरपंच हृषीकेश भगत, संतोष भगत तसेच स्थानिक ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## जुन्या आठवणींना नव्याने उजाळा

## ३९ वर्षांनंतर भरली माजी विद्यार्थ्यांची शाळा

। कर्जत। वार्ताहर।

अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेच्या १९८२-८३ च्या दहावी इयत्तेत शिकलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा पार पडला. यावेळी जणू काही ३९ वर्षांनंतर शाळाच भरल्यासारखे वाटत होते. यावेळी जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.



वांगणीनजीक असलेल्या दोन परिसरात असलेल्या नदीकाठच्या मोरे नर्सरीमध्ये स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरूवात होऊन गणेशवंदन, सरस्वती पूजन, मेधा वैद्य, सुनील हरपुडे, स्वाती शिंदे, विनोद राणे, केदार देशक, अनुप मावळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

मोरे नर्सरीच्या प्रशस्त प्रांगणात असलेले झोपाळे, घसरगुंडी पाहून सारे जण बालपणात हरवले आणि सगळ्यांनी किती आनंद घेतला. स्वादिष्ट स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. भोजनानंतर पुन्हा गप्पा रंगल्या, गाणी गाण्याची हौसही भागवून घेतली. गाण्यांच्या भेंड्या, भावोजीचा खेळ झाला. मजेशीर खेळांनी अजूनच रंगत वाढली. मनोगतांनी नवे विचार कळले. सरते शेवटी दरवर्षी नक्की भेटायचं,तसेच समाजोपयोगी काम करण्याबाबत, लवकरच एक ठाम योजना आखायची तसेच सभासदांपैकी कोणाकडे अचानक अडचण उद्भवल्यास त्यासाठी एक ठराविक निधी कायमस्वरूपी जमा करणे याबाबत नक्कीच विचार करून अंमलात आणण्याचे ठरले.

## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ WORK FROM HOME ९५०३०५८६२४

■ ड्रायव्हर हवा आहे. Pickup/407 टेम्पोवर अनुभवी ड्रायव्हर हवा आहे. १४०००/१५००० गोविंद गोपाळ अँड कंपनी झिराड- ८००७८९३२३२/९४२१९५४३४८

■ वधु-२, वय २३/२६, बारावी /B.A, आई वडिलांचे अपघाती निधन, शेती ४ ऐकर, मुली मामाकडे राहतात. ९९७५६२८६४४/९९७५४९२३४४.

■ पाहिजेत सातघर-अलिबाग येथील साईटकरिता रिअल इस्टेट सेल्स एक्झिक्युटीव्ह, २ ते ५ वर्षांचा अनुभव, ग्रॅज्युएट असणे आवश्यक. संपर्क : ७९७७३१४५६०

■ पाहिजेत स्टाफ नर्स जन्नावार हॉस्पिटल, बाय पास रोड चेंढरे, अलिबाग. ९४२३८९०३१०

जाहिरातीसाठी संपर्क

☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जंजिरा जलदुर्ग पर्यटकांसाठी पुन्हा खुला

### पर्यटकांची वर्दळ सुरू

### मुरुडचे पर्यटन फुलणार

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बंद ठेवण्यात आलेला मुरुडचा सुप्रसिद्ध जंजिरा जलदुर्ग शुक्रवारी ४ फेब्रुवारीपासून पर्यटकांना पाहण्यासाठी खुला करण्यात आला आहे. मधल्या काळात कोरोना रुग्णांची संख्या वाढत असल्याने पुरातत्व खात्याकडून निर्बंध आले होते, मात्र आता काही निर्बंध शिथिल करण्यात आल्याने शनिवारी पर्यटक मुरूडला दाखल झाले आहेत.



३१ डिसेंबरनंतर कोरोना रुग्णसंख्या वाढू लागल्याने शासनाने पर्यटनाबाबत नवीन निर्बंध लागू केले होते. मात्र, दोन दिवसांपूर्वी नियमावली शिथिल केल्याने मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, ठाणे आदी विविध भागांतील पर्यटक फिरण्यासाठी बाहेर पडले आहेत. मुरूडलादेखील शनिवारी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची हजेरी समुद्रकिनारी दिसून आली. मुरूड समुद्रकिनारी फिरण्यासाठी पर्यटकांची मोठी मांदियाळी सायंकाळी दिसत होती. सूर्यास्त पाहण्यासाठी किनाऱ्यावर पर्यटकांनी हजेरी लावली. पर्यटक वर्दळ सुरू झाल्याने व्यावसायिक, हॉटेल्स, लॉजिंग चालक, घरगुती खानावळी चालविणारी मंडळीदेखील सुखावली. जंजिरा खुला झाल्याने मुरूडचे पर्यटन फुलणार अशा प्रतिक्रिया मुरूड समुद्रकिनारी शनिवारी सायंकाळी उशिरा ऐकायला मिळत आहेत. काही नियम शिथिल करण्यात आले असले तरी संचारबंदी राहील, अशी माहिती पोलिसांनी दिली. पर्यटकांच्या वर्दळीने मुरूडचा किनारा फुलून गेला आहे.

### गारव्याने पर्यटक सुखावले

थंडी आणि पर्यटन याचे एक अनोखे नाते आहे. थंडीत पर्यटन फुलते असे म्हटले जाते.उन्हाळ्यात महाबळेश्वर, उटी, काश्मीर हिमाचल प्रदेश अशा थंड वातावरणात पर्यटक हमखास जातात. यावरून याची कल्पना यावी. गेल्या १५ दिवसांपासून मुरुड तालुक्यात थंडी मोठ्या प्रमाणात पडलेली आहे. तापमान १७ सेल्सियस आहे. यामध्ये चढ-उतारदेखील होत आहे.अशा परिस्थितीत कोरोना निर्बंध काहीसे शिथिल करण्यात आल्याने पर्यटनाला बहर येणे अपेक्षित होते.आणि झाले देखील तसेच. काशीद , मुरुड बीचवर पर्यटक डेरेदाखल झालेले दिसून आले. समुद्र किनारीपट्यात गारठा त्यामानाने कमी असतो असा आजवरचा अनुभव यावेळी निसर्गानं सपशेल फेल ठरविला आहे. कारण येथे देखील थंडीचा गारठा मोठा असून स्थानिक नागरिक देखील थंडीने गारठून जात आहेत.

## अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**७ फेब्रुवारी**

१) श्रीम. उलका रवींद्र गावकर
पतंनगर, अलिबाग
७-०२-१९४२

२) श्रीम.वसुधा वसंत खरे
रामनाथ- अलिबाग
७-०२-१९५६

# कर्नाळा अभयारण्य पर्यटकांसाठी खुले




## स्थानिक बचत गटांना मिळणार रोजगार

**कर्नाळा अभयारण्यात बचतगटाद्वारे उपहार गृह चालविण्यात येते. येणारे पर्यटक स्थानिक आगरी पद्धतीने बनविले जाणारे जेवण याठिकाणी आवर्जुन जेवत असतात. अभयारण्य पुन्हा एकदा सुरु झाल्याने स्थानिक महिला बचतगटांना रोजगाराची संधी मिळणार आहे.**

**। पनवेल । वार्ताहर ।**

कोव्हिड-१९ महामारीच्या तिसऱ्या लाटेचा प्रादूर्भाव थोपविण्यासाठी बंद ठेवण्यात आलेले कर्नाळा अभयारण्य नुकतेच पर्यटकांसाठी खुले करण्यात आल्याने निसर्गप्रेमी पर्यटकांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे.

कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा संभाव्य धोका टाळण्यासाठी जानेवारी महिन्यात शासनाच्या निर्देशानुसार हे अभयारण्य बंद ठेवण्यात आले होते. या निर्णयामुळे पर्यटकांची मोठी हिरमोड झाली होती. एकीकडे मॉल्स, शॉपिंग कॉम्प्लेक्स सुरु असताना निसर्गाच्या सान्निध्यात वसलेले कर्नाळा अभयारण्य बंद ठेवल्याने निसर्गप्रेमी पर्यटकांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली होती.

आता अभयारण्य सुरु झाल्याने पहिल्याच दिवशी शेकडो पर्यटकांनी अभयारण्यात

### निसर्गप्रेमी, पर्यटकांमध्ये उत्साह

हजेरी लावली.

कर्नाळा अभयारण्यात परिसरात पक्ष्यांच्या सुमारे १५० स्थानिक व सुमारे ३७ स्थलांतरित प्रजाती आढळून येतात. अभयारण्यासह कर्नाळा किल्ला व तेथील सुळका हे देखील पर्यटकांचे आकर्षण राहिले आहे. तसेच कर्नाळा किल्ल्याचे शिवाजी महाराजांच्या कार्यकाळात देखील एक वेगळी ओळख राहिली आहे. त्यामुळे या वास्तुला ऐतिहासिक महत्व आहे.

> **कोव्हिडचे नियमांचे पर्यटकांना अभयारण्य परिसरात प्रवेश देण्यात येत आहे. याकरिता आम्ही प्रवेशद्वारावरच पर्यकांची तपासणी करणार आहोत. पर्यटकांनी कोव्हिडचे नियम पाळावे. लसीकरणाचे दोन डोस घेतले असून, संबंधित अन्य नियम बंधनकारक आहेत.**
>
> **- नारायण राठोड, वनपरिक्षेत्र अधिकारी, कर्नाळा**

अशा सर्वानाच हे पर्यटन स्थळ सुरु होत असल्याने याठिकाणी मुक्त संचार करता येणार आहे.

# अपघातातील आरोपी जामीनावर बाहेर

**। उरण । वार्ताहर ।**

परिसरातील कोटगाव येथे झालेल्या अपघातातील आरोपी यांना पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. मात्र न्यायालयाने आरोपींना जामीन मंजूर केला असून, त्वरित जामीन मिळाल्याने नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे.

अपघातातील मयत सुधीर बाळकृष्ण कोटकर हे नेहमीप्रमाणे सकाळच्या सुमारास मॉर्निंग वॉकसाठी बोकडविरा पोलीसचौकी परिसरात गेले असता अज्ञात वाहानाच्या धडकेत निधन पावले होते. मात्र,अपघातानंतर वाहनचालक वाहनासह फरार झाला होता. या अपघातातील आरोपीला उरण पोलिसांनी इको गाडीसह अटक केली असली तरी आरोपी शिवाजी धोत्रे याची जामीनावर सुटका केली आहे. पुढील तपास एपीआय सचिन पाटील करीत आहेत.


# कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही






वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**NKGSB बँक अलिबाग शाखा कर्मचारी वृंद, अलिबाग शाखेला ८ वर्ष पूर्ण झाल्या बद्दल**


## म हत्त्वा चे

### मुलचंद जैन यांचे निधन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील धाटाव येथील रहिवासी मात्र मुळचे नागोठणेकर असेलेले मुलचंदशेठ प्रतापमल जैन-परमार (६७) यांचे मुंबई येथील रूग्णालयात अल्पशा आजाराने निधन झाले आहे.



राजिपचे माजी सदस्य नरेंद्र जैन यांचे ते मोठे बंधू होत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सुन, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे.

### नांदाईपाडा येथे गणेशोत्सव सोहळा



**। अलिबाग । वार्ताहर ।**

येथील श्रीवरदविनायक मंदिरात माघी गणेशोत्सव सोहळा भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी देवस्थान मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तथा अन्य पदाधिकारी यांच्याहस्ते बाप्पाचे पूजन करण्यात आले. पूजनानंतर पंचक्रोशीतील विविध वारकरी भजन मंडळांनी भक्तीमय सुरांची मेजवानी देऊ केली. तर रविंद्र वाघमारे यांचे सुश्राव्य किर्तन संपन्न झाले.

गणेश जन्मोत्सव साजरा केयानंतर सत्यनारायणाची महापूजा करण्यात आली. यानंतर रात्रीपर्यंत पुन्हा एकदा भजनांनी आपला ताल धरत वातावरण मंत्रमुग्ध केले. तर रात्रीच्या सुमारास पालखी मिरवणूक सोहळा संपन्न झाला.

### साई मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

येथील कान्होजी आंग्रेनगर परिसरात श्रीसाईबाबा मंदिर जिर्णोध्दार व मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा नुकताच संपन्न झाला. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे रेवदंडा चिटणीस राजन वाडकर, सामाजिक कार्यकर्ते प्रफुल्ल मोरे, शरद गोंधळी तसेच आग्रावचे नारायण मुंबईकर, मुरूड पंचायत समिती उपसभापती चंद्रकांत मोहिते, भगिरथ पाटील, आशिष भट, सुराराम माळी, अशोक नाईक, ग्रा.प.सदस्या शिल्पा ठाकूर, विकास ठाकूर आदी मान्यवर उपस्थिती होते.

## क्राईम डायरी

### तरुणाचा अपघाती मृत्यू

**रसायनी :** परिसरात एका अज्ञात वाहनाच्या धडकेत तरुणाचा अपघाती मृत्यू झाला आहे. अनिकेत अनिल तांडेल असे या तरुणाचे नाव आहे.

गुळसुंदे येथील रहिवासी असलेला अनिकेत दुचाकीद्वारे प्रवास करत असताना रसायनी कॉर्नर परिसरात त्यांना एका अज्ञात वाहनाने घडक दिली. या धडकेमुळे झालेल्या अपघातात अनिकेत गंभीर झाला असून, त्यामुळे मृत्यू झाला.

याप्रकरणी रसायनी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सहा.पोलीस निरीक्षक गुंड करीत आहेत.

### सासरच्यांकडून महिलेला मारहाण

**रेवदंडा :** परिसरात सासरच्या मंडळीकडून महिलेला शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली आहे. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेतील पिडीता आणि आरोपी यांचे संयुक्त स्वरुपाचे घर असून, सासु आणि सासरे ही सासरची मंडळी तळमजल्यावर तर वरच्या मजल्यावर पिडीता ही नवरा आणि मुलगी यांचेसोबत राहतात.

घटनेच्या दिवशी पिडीता आणि त्यांची मुलगी घरामध्ये एकटी असताना सासुसाऱ्यांनी अश्लीलपणे बोल लावत पिडीतेला शिवीगाळ केली. तसेच मारहाण करत दमदाटी केली. याबाबतचा अधिक तपास महाराष्ट्र सहाय्यक फौजदार गोसावी या करीत आहेत.

### पूर्ववैमन्सातून मारहाणीचे गुन्हे दाखल

**कर्जत :** तालुक्यातील आंबोट-गौळवाडी येथे शेजाऱ्यांनी पूर्ववैमन्सातून एकमेकांना मारहाण करत कर्जत पोलीस ठाणे येथे परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

घटनेतील आरोपी, फिर्यादी, साक्षीदार हे परस्परांचे शेजारी असून, राहत्या घराची हद्द आणि शेतजमीन याबाबत उभयंतामध्ये जूने वाद आहेत. या जुन्या वादातून दोन्ही गटात झालेल्या भांडणांमध्ये परस्परांना मारहाण करत दुखापत केली. तसेच शिवीगाळ करत दमदाटी केली. याप्रकरणी अधिक तपास पोलीस नाईक शेळके करीत आहेत.

### वाहतूक नियमांचे उल्लंघन बेतले जीवावर

**अलिबाग :** तालुक्यातील एका नागरिकाला वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे जीवावर बेतले आहे.

मयत आरोपी हा पेण ते अलिबाग असा प्रवास करीत असताना, त्याच्या ताब्यातील मोटारसायकल (क्र.एमएच.०६. सीसी.२७४८) वाहनाने भरधाव वेगात प्रवास करत होता. दरम्यान, तळवली येथील हनुमान मंदिरानजीकच्या पूलावर, गाडी कठड्याला आदळून अपघात घडला. या अपघात तो जखमी होवून मृत पावला.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पोलीस हवालदार निगडे करीत आहेत.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग. मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे रजपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक श्रीमती शोभा तुषार चव्हाण यांचेकडून विकत घेणेचे ठरविलेले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ०२ | ०६ | १-६४-०० | ०१-४४ |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०७-०२-२०२२

**ॲड. सी.बी. ओसवाल**
बी.कॉम. एल.एल.बी
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे- मार्गाची वाडी, तालुका- कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री.हेमंत वसंत नार्वेकर | २९ | ९ | ०-१६-०० | ०-०६ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरुपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०६-०२-२०२२

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी
मुद्रे बु. कर्जत, ता.कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक श्री. अविनाश रंगनाथ गुंड, रा. चांदई, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मौजे चांदई ता. कर्जत, जि. रायगड.जमिन मिळकतीचे वर्णन**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५३/६ | ०-६३-०० | ०-६७ |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बॅंक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आणू द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

कर्जत
दिनांक : ०६-०२-२०२२

सही/-
**ॲड. गीतांजली जी. फुलावरे**
कार्यालय पत्ता :छ. शिवाजी महाराज चौक,
कचेरी रोड, अपोझिट तुलसी अंगण
बिल्डींग, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०२१,
मो. ८८८०४५३७६/८६००३५२९८२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-लाडीवली ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| श्रीकांत मोरेश्वर काळे<br>ओजस रमेश काळे<br>तेजश्री आशिष जोशी | २५ | ९ | ०-०६-६० | ०=०३ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण,दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. माागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

हे सर्वांस कळावे.

ठिकाण:कर्जत
दिनांक : ७/२/२०२२

**ॲड.नंदिनी पंकज कदम**
पत्ता- १० कपिला को.ऑप.हौसिंग
सोसायटी, युको बॅंकेजवळ,
कचेरी रोड, कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड
मो.९५११८१३०१२/९४२३३७८००३

## e-TENDER NOTICE

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-34 Refloat 7000022150 | Work of replacement of existing old battery chargers & battery sets with new digital battery charger & battery sets at various substation under EHV (O&M) Circle, Panvel | Rs. 58.06 Lakhs |

EMD 1% of estimated cost & Tender fee Rs.500/- + GST. **Submission of bids from 04.02.2022 to 11.02.2022 up to 23:59hrs, Opening date:-12.02.2022.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm.) Tel. No. 9167026141

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
### (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषांगिक कामामुळे स्थलांतरीत होणाऱ्या वरचे ओवळे येथील सिडकोच्या जमिनीवरील बांधकाम क्र. VO-२८७, २८७A, २८८, २९०, २९१, २९२, २९३, २९४, २९५, २९६, २९७, २९८, २९९, ३००, ३०१, ३०२ व ३०३ हे निवासी बांधकाम **१) अजय लालवंत लींबारे, २) अशोक लक्ष्मण भगत, ३) तपस कर, ४) धनाजी नाना कांबळे, ५) धर्मेश मधुकर पाटील, ६) धर्मेश विनोदभाई शाह, ७) नाझ्मुदिन इस्माईल काचवाला, ८) मेघा हेमंत यादव, ९) मंजू रेमंत यादव, १०) रमेश कुमार, ११) रमाकांत अ. पाटील, १२) विजय विनायक कुरकुरे, १३) सज्जन सिंग यादव, १४) संतोष शेट्टी, १५) सुमित कुमार, १६) हेमंत एस. यादव** बाधित झालेले आहे. सदर बांधकाम धारकांना भूखंड क्र. ९, सेक्टर -१, क्षेत्र - ७०० चौ.मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

| गावाचे नाव/ संचिका क्र. | इमारत क्र. | बांधकाम क्र. | बांधकाम धारकाचे नाव | बांधकामाचे छपराखालील क्षेत्र (चौ.मी.) | वाटपित भूखंडाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| वरचे ओवळे | VOV-ICOGS-१७१ | VO-२८७, २८७A, २८८, २९०, २९१, २९२, २९३, २९४, २९५, २९६, २९७, २९८, २९९, ३००, ३०१, ३०२ व ३०३ | १)अजय लालवंत लींबारे<br>२)अशोक लक्ष्मण भगत<br>३) तपस कर<br>४)धनाजी नाना कांबळे<br>५)धर्मेश मधुकर पाटील<br>६)धर्मेश विनोदभाई शाह<br>७)नाझ्मुदिन इस्माईल काचवाला<br>८)मेघा हेमंत यादव<br>९)मंजू रेमंत यादव<br>१०)रमेश कुमार<br>११)रमाकांत अ. पाटील<br>१२)विजय विनायक कुरकुरे<br>१३)सज्जन सिंग यादव<br>१४)संतोष शेट्टी<br>१५)सुमित कुमार<br>१६) हेमंत एस. यादव | ३६०.७० | पुष्पक | १ | ९ | ७०० |

बांधकामधारकांपैकी १) अजय लालवंत लींबारे २) अशोक लक्ष्मण ३) धनाजी नाना कांबळे ४) धर्मेश मधुकर पाटील ५) धर्मेश विनोदभाई शाह ६) हेमंत एस. यादव ७) मंजू रेमंत यादव ८) मेघा हेमंत यादव ९) नाझ्मुदिन इस्माईल काचवाला १०) रमाकांत अ. पाटील ११) रमेश कुमार १२) संतोष शेट्टी १३) सुमित कुमार १४) तपस कर व १५) विजय विनायक कुरकुरे यांना इरादित भूखंड क्र. ९, सेक्टर-१, क्षेत्र-७०० चौ.मी. या भूखंडामधील त्यांचे हिश्याच्या क्षेत्राचे हक्कसोड करण्यात येवून ते दि. ०९.०३.२०१८ रोजी सह दुय्यम निबंधक पनवेल यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्राप्रमाणे सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच उपरोक्त भूखंडाचा ताबा घेण्यास व पुढील कार्यवाहीसाठी पात्र ठरू शकतात.

| अ.क्र. | नावे |
|---|---|
| १ | सज्जन सिंग यादव |

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नांवे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तीच्या नांवे सिडकोकडून भूखंडाचे करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसापर्यंत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत / तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतींसह **अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ), तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुआंवि)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४१७/२०२१-२२

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# टीम इंडिया विश्वविजेता

। अँटिग्वा । वृत्तसंस्था ।

भारताचा युवा संघ पुन्हा एकदा अंडर १९ क्रिकेटमध्ये वर्ल्ड चॅम्पियन बनला आहे. अँटिंग्वाच्या सर व्हिव्हियन रिचर्ड्स स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात यश धुलच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या अंडर १९ टीमने इंग्लंडचा चार विकेट्स आणि १४ चेंडू राखून पराभव केला. विकेटकिपर दिनेश बानाने षटकार ठोकून भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.




इंग्लंडने भारतासमोर विजयासाठी १९० धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. भारताच्या युवा टीमने कुठलाही धोका न पत्करता संयमाने फलंदाजी करत हे लक्ष्य पार केलं. सामन्यात एकवेळ भारताची चार बाद ९७ अशी स्थिती होती. त्यावेळी ऑलराऊंडर निशांत सिंधू आणि राज बावाने पाचव्या विकेटसाठी ६७ धावांची महत्त्वाची भागीदारी केली. निशांत सिंधू (५०) धावांवर नाबाद राहिला, तर राज बावाने (३५) धावा केल्या. या सामन्याचा नायक ठरला तो राज बावा. त्याने पाच विकेट्स आणि ३५ धावा अशी अष्टपैलू कामगिरी केली.

## इंग्लंडला चारली धूळ
## पाचव्यांदा विश्वचषकावर कब्जा

### यश धुल ठरला पाचवा कर्णधार!

आयसीसीचा १९ वर्षांखालील विश्वचषक भारतीय संघाला मिळवून देणारा यश धुल हा पाचवा कर्णधार ठरला. यापूर्वी असा पराक्रम मो. कैफ (२०००), विराट कोहली (२००८), उन्मुक्त चंद (२०१२) आणि पृथ्वी शॉने (२०१८) गाजवला आहे.

### कौतुकांचा वर्षाव

विश्वविजेत्या भारतीय युवा संघावर कौतुकांचा वर्षाव होत आहे. एनसीए इनपुट हेड व्हीव्हीएस लक्ष्मणसह भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड, बीसीसीआय अध्यक्ष सौरव गांगुली, सचिव जय शाह यांनी विजेत्या संघाचे खास कौतुक केले. तसेच प्रत्येक खेळाडूला ४० लाख आणि सपोर्ट स्टाफच्या प्रत्येक सदस्याला २५ लाखांचे बक्षीस जय शाह यांनी जाहीर केले आहे.

### विक्रमी कामगिरी

शेख रशिदने विश्वचषकात तीन अर्धशतके आपल्या नावे नोंद केली. त्याने फायनलमध्ये इंग्लंडविरुद्ध शानदार ५० धावांची खेळी केली. भारताकडून यश धुल हा यंदाच्या विश्वचषकामध्ये शतकवीर कर्णधार ठरला. यासह त्याने कर्णधाराच्या भूमिकेत भारताचा तिसरा शतकवीर होण्याचा पराक्रम गाजवला आहे.

## महत्त्वाचे

### सुरेश रैनाच्या वडिलांचे निधन

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघातील अष्टपैलू खेळाडू सुरेश रैनाचे वडील त्रिलोकचंद रैना यांचे निधन झाले. कर्करोगाशी सुरु असलेली त्यांची झुंज अखेर अपयशी ठरली. त्रिलोकचंद रैना हे लष्करात अधिकारी होते. गाझियाबाद येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांनी रविवारी अखेरचा श्वास घेतला. त्रिलोकचंद रैना हे मुळ जम्मू काश्मीरमधील रैनावारी गावाचे रहिवासी होते. १९९० दशकात काश्मीरी पंडीतांवर झालेल्या हल्ल्यानंतर गाव सोडलं होतं. त्यानंतर ते मुरादनगरमध्ये स्थायिक झाले होते.

### इंडिजचा १६७ धावांत खेळ खल्लास

**नवी दिल्ली :** अहमदाबाद येथे सुरु असलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात पाहुण्या वेस्ट इंडिजचा डाव अवघ्या १७६ धावांत संपुष्टात आला. युजवेंद्र चहलच्या ४ आणि वाशिंग्टनच्या २ विकेटसह प्रसिद्ध कृष्णा आणि मोहम्मद सिराजनं केलेल्या अचूक माऱ्यासमोर कॅरेबियन संघाची अवस्था बिकट झाली. टीम इंडियाचा हा एक हजारावा सामना आहे. भारताला ऐतिहासिक सामना जिंकण्यासाठी अवघ्या १७७ धावांचे आव्हान आहे. तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून कर्णधार रोहितने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.

# वाघोड्यात शेकापची विकासगंगा

➤विविध विकासकामांचे भूमीपूजन ➤ माजी आ. पंडित पाटील, चित्रा पाटील यांची उपस्थिती

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून अलिबाग तालुक्यातल वाघोडे ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीत विविध विकासकामांचे भूमीपूजन माजी आ. पंडित पाटील, जि.प. सदस्या चित्रा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. हा कार्यक्रम माघी गणेशोत्सवाच्या निमित्त पार पडला.




ग्रुप ग्रामपंचायत वाघोडे येथे शालेय शौचालय, वाघोडे गाव सुशोभुमिकरण, चंदरवाडी शौचालय, चंदरवाडी गणेश मंदिरावर शेड बांधणे या कामांचे भूमीपूजन माजी आमदार पंडित पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी जि.प. सदस्या चित्रा पाटील, माजी सरपंच सुनील माने, सरपंच कृष्णा जाधव, उपसरपंच सुरेखा नाईक, सदस्य सुमित माने, माजी उपसरपंच संतोष पवार, धनुर्धन पाटील, ग्रामस्थ वामन बने, रुपेश माने, यशवंत दळवी, सुरेश नाईक, मुकेश नाईक, ग्रामसेवक निलेश गावंड, ग्रामस्थ, महिला मंडळासह अन्य मान्यवर उपस्थित होते. शेतकरी कामगार पक्ष गावचा विकास करु शकतो, असा ठाम विश्वास ग्रामस्थांमध्ये निर्माण झाला असून, समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## गणेशोत्सवातून गड किल्ल्यांचा इतिहास

**उरण :** शहरातील शिवराज युवा प्रतिष्ठान या सामाजिक संघटनेतर्फे दरवर्षी माघी गणेशोत्सव साजरा केला जातो. यावर्षी कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता शासनाचे नियम पाळत सोशल फिजिकल डिस्टन्स पाळत मास्क व सॅनिटायजरचा वापर करत अत्यंत साध्या पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्यात आला. दरम्यान, किल्ला म्हणजे काय (किल्ल्याचे अंतरंग व वास्तूची ओळख) या विषयावर अपरिचित गडकोट शोध अभ्यासक, शिवभक्त जयकांत शिंक्रे (पालघर) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## आठवणींना उजाळा



## शतकवीर खेळाडूसाठी दिला गाजराचा हलवा

। मुंबई । प्रतिनिधी ।

भारताचे माजी क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांनी लता मंगेशकर यांच्यासोबतच्या आठवणी ताज्या केल्या. लता मंगेशकर यांचे क्रिकेटवर खूप प्रेम होते. अनेक कसोटी सामन्यांना त्या उपस्थित असायच्या. लंडनला लॉर्ड्सच्या समोरच त्यांचं घर होतं. लंडनला सामने असायचे तेव्हा त्या खेळाडूंना घरी बोलवायच्या. मी शतक मारलं होतं तेव्हा त्यांनी गाजर हलवा केला होता. झणझणीत मटण केलं होतं. राजसिंग हे मॅनेजर सोबत होते. त्यांच्यासोबत क्रिकेटवर गप्पा मारायला आवडायचं, अशा आठवणी भारताचे माजी क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांनी सांगितल्या.

लता मंगेशकर यांनी भारताने वर्ल्ड कप जिंकल्यानंतर त्या संघातील खेळाडूंसाठी एक प्रोग्रॅम दिल्लीत केला होता. या कार्यक्रमातून मिळालेले पैसे त्यांनी खेळाडूंना बक्षीस म्हणून दिले होते. याचीही आठवण दिलीप वेंगसरकर यांनी सांगितली. वर्ल्ड कप जिंकल्यानंतर त्यांनी प्रत्येकाला २५ हजार रुपये दिले होते. दिल्लीत प्रोग्रॅम केला होता. त्यानंतर खेळाडूंना प्रत्येकी एक लाख रुपये मिळाले होते.

पहिल्यापासूनच क्रिकेटवर प्रेम असणाऱ्या लता मंगेशकर यांनी अनेकदा क्रिकेटपटूंची भेट घेऊन त्यांचे कौतुक केले होते. वेंगसरकर यांनी सांगितलं की, १९७९ मध्ये पाकिस्तानला भारताने पराभूत केलं होतं. त्यानंतर ताज हॉटेलमध्ये लता मंगेशकर यांनी संघाची भेट घेतली होती.



# शिघ्रे शाळेत ट्रॉफी रॅक, टेबल ग्लासचे उद्‍घाटन

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

असगर शेठ अली खतीब यांजकडून रायगड जिल्हा परिषद केंद्र शिघ्रे शाळेला ट्रॉफी रॅक व टेबल ग्लास भेट वस्तू देण्यात आली. या वस्तूंचे उद्‍घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

नथुराम जानू माळी, रा. शिघ्रे यांच्या प्रयत्नांतून असगर शेठ अली खतीब, मेहबूब असगर खतीब, मकसूद असगर खतीब, रा. मुरुड यांजकडून या भेटवस्तू प्राप्त झाल्या आहेत. या उद्‍घाटन सोहळ्यामध्ये खतीब कुटुंबीय, ग्रुप ग्रामपंचायत सरपंच संतोष पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष माळी, उपाध्यक्ष किशोरी गायकर, रवी अदावडे, जानू हंबीर तसेच पालक सहभागी होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक शिवप्रसाद रोडगे, सुरेखा बोऱ्हाडे, अमोल चोळके, प्रमोद फुंदे, पल्लवी कोरके व विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

# शेकाप महिला आघाडीतर्फे हळदीकुंकू समारंभ

ममता प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्ष कार्यालय खांदा कॉलनी येथे महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन शेतकरी कामगार पक्ष खांदा कॉलनी महिला आघाडी व जे. एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्यातर्फे दि. ५ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. यावेळी महिलांना हळदीकुंकू लावून महिलांना वाण स्वरूपात तुळशीचे रोप देण्यात आले.




या कार्यक्रमामध्ये खांदा कॉलनीमधील विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान जेएम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या ममता प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज, नगरसेविका कुसुम पाटील, शेकाप महिला आघाडीच्या माधुरी गोसावी, शशिकला सिंग, अमिता चव्हाण, क्रांती ज्योत महिला विकास फाऊंडेशनच्या अध्यक्ष रुपाली शिंदे, रत्नमाला पाबरेकर उपस्थित होत्या.

तसेच सध्याच्या कोरोना काळामध्ये महिलांसाठी शेतकरी कामगार पक्ष आणि जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्या माध्यमातून सर्व भगिनींची आरोग्य संदर्भात रुटीन चेकअप करून रुटीन ब्लड चेकअप वर ५० टक्के सवलतीचे कार्ड भेट देण्यात आले. महिलांच्या आरोग्याविषयी जागृत राहून या सेवा दिल्याबद्दल उपस्थित सर्व महिला वर्गातून सर्वांचे आभार मानण्यात आले.

## टीम इंडियाची लतादीदींना अनोखी श्रद्धांजली

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट संघ वेस्ट इंडिजविरुद्ध तीन सामन्यांची वनडे मालिका खेळत असून, टीम इंडियाचा हा एक हजारावा सामना आहे. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर हा सामना होत आहे. क्रिकेटविश्वात एक हजार एकदिवसीय सामने खेळणारा भारत हा पहिला संघ ठरला आहे.

सामना सुरू होण्याच्या काही तास आधी भारतरत्न लता मंगेशकर यांचे निधन झाले. लतादीदी क्रिकेटच्या फार मोठ्या चाहत्या होत्या. भारतीय संघाने १९८३ साली जिंकलेल्या पहिल्या वर्ल्डकप विजेतेपदाच्या त्या साक्षीदार होत्या. लतादीदींच्या निधनाने भारतीय संघाने शोक व्यक्त केला असून, प्रत्येक खेळाडूच्या दंडावर काळी पट्टी बांधून अनोखी श्रद्धांजली वाहण्यात आली आहे, असे बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी सांगितले.



## डॉ. राजेश शिगवण सेट परीक्षा उत्तीर्ण

**तळा :** तालुक्यातील कर्नाळा गावाचे डॉ. राजेश शिगवण यांनी Sociology विषयात SET परीक्षेत यश संपादन करून कर्नाळा गावाच्या




शिरपेचात मानाचा तुरा रोवलाआहे. जिद्द, आत्मविश्वास, सबुरीच्या बळावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून हे यश संपादन केले आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असून, नोकरी करून शिक्षण घेत होते. त्यांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक कार्य सांभाळून हे यश मिळवले आहे. त्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# दत्तमहाराजांच्या पादुकांची गुरुवारी प्रदक्षिणा परिक्रमा

अन्नछत्र ट्रस्टच्या पुढाकाराने पालखीचे आयोजन

। चौल । प्रतिनिधी ।

चौल भवाळे येथील पर्वतनिवासी दत्तमहाराजांच्या पादुकांची पायी पालखी प्रदक्षिणा परिक्रमा कार्यक्रमाचे गुरुवार, दि. १० फेब्रुवारी रोजी दत्तकृपा अन्नछत्र ट्रस्ट अलिबागच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. सकाळी सात वाजता दत्त मंदिरातून या पालखीला सुरुवात होईल, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष महेश मोरे यांनी दिली.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या सर्व नियमांचे पालन करीत हा पालखी सोहळा संपन्न होणार आहे. दरम्यान, ही पालखी चौल भोवाळेमार्गे मुख्य रस्त्यावरुन चौलनाका, चौल नाका, भाटगल्ली, सागमळा, चौलमळा येथून पुढे देवघर, सराई, हनुमानपाडा अशी मार्गक्रमणा करीत भवाळे येथून दत्त मंदिरात प्रस्थान करणार आहे. तरी इच्छुक दत्तभक्तांनी या दत्तमहाराजांच्या पादुका दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महेश मोरे यांनी केले आहे.

# विहूर आदिवासीवाडीत तरुणांनी केली जाळरेषा

फणसाड अभयारण्य सुरक्षित राहण्यासाठी कामाला वेग

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुड तालुक्यात सुप्रसिद्ध असे फणसाड अभयारण्य आहे. सुमारे ५४ चौरस किलोमीटर क्षेत्रात या अभ्यारण्याची व्याप्ती आहे. सदरचे अभयारण्य आगीपासून सुरक्षित राहावे यासाठी फणसाड अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी राजवर्धन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली जळीत रेषा काढण्याचे काम वेगात सुरु आहे. फणसाड अभयारण्याच्या आजूबाजूला रस्त्याचा परिसर असून, वाटसरू यांच्याकडून सिगारेट अथवा माचीसची कांडी ही वणव्याला कारणीभूत ठरू नये यासाठी सुके गवत व झाडीझुडपे जाळून टाकली जातात.



वनरक्षक अरुण पाटील यांनी विहूर आदिवासी वाडीतील तरुणाशी संपर्क साधून जळीत रेषा काढण्यासाठी मदत मागितली. त्याप्रमाणे आदिवासी वाडीतील असंख्य तरुणांनी रस्त्यावर उतरून जळीत रेषा काढण्याचे काम हाती घेतले आहे. यावेळी विहूर आदिवासी वाडीचे अध्यक्ष लक्ष्मण पवार, उपाध्यक्ष संजय वाघमारे यांच्यासह असंख्य तरुण या कामात सहभागी झाले होते. नवाबांचा राजवाडा ते विहूर परिसर या भागात जळीत रेषा काढून फणसाड अभयारण्य सुरक्षित करण्यात येत आहे.

## सोशल मीडियावर लतादीदींना श्रद्धांजली

SOCIAL MEDIA पडसाद

वर्षा मेहता

। अलिबाग ।

नाइटिंगेल ऑफ इंडिया म्हटल्या जाणाऱ्या, ९२ वर्षीय दिग्गज गायिका लता मंगेशकर यांचे रविवारी सकाळी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. कोरोना पॉझिटिव्ह आल्यानंतर त्यांना गेल्या महिन्यात रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आणि न्यूमोनियावरही उपचार सुरू होते. २८ सप्टेंबर १९२९ रोजी मध्य प्रदेशातील इंदूर येथे जन्मलेल्या लता मंगेशकर यांना देशातील काही सर्वोच्च नागरी पुरस्कार -भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण आणि दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाले आहेत.



त्यांच्या निधनाची बातमी कळताच पूर्ण देशात शोकाकूल पसरला. अनेकांनी लतादीदींनी गायिलेल्या गाण्यांचे व्हिडिओ, ऑडिओ शेअर केले. प्रत्येक क्षेत्रातील सेलेब्रिटींपासून सामान्य लोकांपर्यंत सर्वांनीच लतादीदींना सोशल मीडियाच्या माध्यमातून श्रद्धांजली वाहिली. अनेकांनी लिहिले, की त्यांचे निधन जरी झाले असले, तरी त्यांच्या चाहत्यांच्या हृदयात आणि त्यांच्या मधुर आवाजातून आणि गाण्यांद्वारे अमर राहणार आहे. त्यांनी एक वारसा मागे सोडला आहे. 'भारताने एक रत्न गमावले. मी शब्दांच्या पलीकडे व्यथित आहे. दयाळू आणि काळजीवाहू लतादीदी आम्हाला सोडून गेल्या. त्यांच्या जाण्याने देशात एक पोकळी निर्माण झाली आहे, जी भरली जाऊ शकत नाही. येणाऱ्या पिढ्या त्यांना भारतीय संस्कृतीच्या दिग्गज म्हणून स्मरण ठेवतील, ज्यांच्या मधुर आवाजात लोकांना मंत्रमुग्ध करण्याची अतुलनीय क्षमता होती, असे पंतप्रधान मोदींनी ट्विट केले.

# रुग्णवाहिका चालकांची उपासमार

➤तीन महिने पगारापासूनच वंचित
➤आरोग्य खात्याचे अक्षम्य दुर्लक्ष

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुड ग्रामीण रुग्णालयातील १०२ नंबर ॲम्ब्युलन्सवर काम करणाऱ्या चालकांचे मागील तीन महिन्यांपासून वेतन रखडले असून, आरोग्य खात्याचे दुर्लक्ष झाल्याने या चालकांवर उपासमारीची पाळी आली आहे. वेळोवेळी या चालकांनी वरिष्ठांना कळवूनसुद्धा वेतन मिळत नसल्याने हे सर्व चालक हवालदिल झाले आहेत.

ॲम्ब्युलन्सवर चालक असणाऱ्या पनवेल, अलिबाग, रोहा, उरण, कर्जत चौक, महाड, रोहा आदी तालुक्यांतील चालकांना मागील तीन महिन्यांचा पगार मिळालेला नाही. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा




करावयाचा हा प्रश्न येथे निर्माण झाला आहे.

ग्रामीण रुग्णालयातील १०२ ॲम्ब्युलन्सचा उपयोग आरटीपीसीआर सॅम्पल जिल्हा रुग्णालयात घेऊन जाणे, व्हॅक्सिन आणणे, औषधे आणणे, ऑक्सिजन आणणे, व्हॅक्सिनेशन सेंटरवर व्हॅक्सिनची ने-आण करणे, अतितातडीच्या रुग्णास तातडीने जिल्हा रुग्णालय व अन्य हॉस्पिटलमध्ये पोहोचवणे, गरोदर मातांना घरातून रुग्णालयात आणणे, तसेच त्यांना प्रसूतीनंतर त्यांच्या घरी सुखरूप सोडणे आदी स्वरुपाची कामे येथील चालक २४ तास गरज लागेल तेव्हा करीत असतात.

ॲशकॉम मीडिया इंडिया प्रायव्हेट लिमिटेड भोपाळ या कंपनीकडून येथील चालकांना पगार दिला जातोय. परंतु, वारंवार तीन-चार महिन्यांच्या विलंबानंतर सातत्याने फोन केल्यावर एक किंवा दोन महिन्यांचा पगार दिला जातो. तोही कधी पूर्ण, तर कधी अर्धा पगार या चालकांना मिळत असतो.

### आरोग्यमंत्र्यांनी लक्ष घालावे

या चालकांना किमान वेतनप्रमाणे पगार मिळणे खूप आवश्यक आहे. परंतु, कोणताही अधिकारी याकडे लक्ष देत नसल्याने ठेकेदार चांगलाच नफा कमवत असल्याची भावना चालकांमध्ये आहे. आरोग्यमंत्र्यांनी या बाबीकडे गांभीर्यपूर्वक लक्ष द्यावे व चालकांना नियमित व केंद्र शासनाप्रमाणे समान काम समान वेतन मिळावे, अशी चालकांकडून मागणी होत आहे.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2021)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)